म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# बाळशारदा




REFBK-0004238

संग्राहकः- गणेश हरी पाटील.

# बालशारदा

(मुलांकरितां आधुनिक कवींच्या कवितांचा सचित्र संग्रह)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८२३८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0004238

संग्राहक :

गणेश हरी पाटील

१९३०

किंमत आठ आणे

प्रकाशक :—
हरी गणूजी पाटील,
रिटायर्ड सुपरवायझिंग ऑफिसर,
२७८, सदाशिव पेठ, पुणें.

[ ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क संग्राहकांनीं आपलेकडे राखून ठेविले आहेत. ]

मुद्रक :—
सीताराम वासुदेव फडणीस, बी.ए.,
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
चिमणबाग, टिळकरस्ता, पुणें.

# प्रस्तावना

मुलांना हसत खेळत गाणीं म्हणून दाखवावीं व त्यांच्या हृदयांत काव्याची आवड उत्पन्न करावी या हेतूनें आज 'बालशारदा' उल्हसित वृत्तीनें लेकरांच्या सृष्टींत प्रवेश करीत आहे. मुलें तिचें आनंदानें स्वागत करतीलच. सायंकाळीं झोपाळ्यावर बसून झोके घेत असतांना बहीण ओव्या म्हणून आपल्या भावंडांची करमणूक करते, त्याप्रमाणें 'बालशारदा' आपल्या विविध विषयांवरील सोप्या व गोड कविता मुलांना गाऊन दाखवून त्यांचें घटकाभर मनोरंजन करील अशी संग्राहकास खात्री वाटत आहे. प्रौढ रसिकांच्या सहवासांत वीणेचे मंजुळ झंकार काढून त्यांचीं अंतःकरणें उचंबळवून टाकणारी 'शारदा' बालरूप धारण करून स्वतःला मुलांची शारदा म्हणवून घेण्यांत कौतुक मानील यांत शंका नाहीं. फुलाप्रमाणें मृदु अंतःकरणाचें व फुलपांखराप्रमाणें निष्काळजी स्वभावाचें मूल म्हणजे साक्षात् आनंदाची मूर्ति. अशा या सरळ, कोमल व आनंदी वृत्तीच्या मुलांना, महाराष्ट्रांतील आधुनिक कवींनीं वेळोवेळीं स्फूर्ति होऊन लिहिलेल्या सोप्या व मधुर कवितांची ओळख करून द्यावी; त्यांनीं त्या वाचाव्या, गोड गळ्यावर म्हणाव्या आणि त्यायोगानें त्यांच्या हृदयाचा विकास होऊन, त्यांच्या नैसर्गिक आनंदी वृत्तीची जोपासना व्हावी हाच उत्कट हेतू प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या मुळाशीं आहे.

काव्याचा मुख्य हेतू मनोरंजन हा असल्यानें हा विषय बहुधा सर्वांना प्रिय असतो. थकल्या भागलेल्या जीवाचे श्रम हलके करून काव्य त्याला टवटवीत पवित्र व निर्मळ करतें आणि मानसिक उन्नतीस हातभार लावतें. काव्याबरोबर संगीताची आवड प्रत्येकाला असते; उत्तम काव्य व गोड चाल यांचा समसमा संगम

झाल्यास त्याचा परिणाम मनुष्याच्या हृदयावर दीर्घकाल राहतो. उत्तम काव्याचें सोपें लक्षण हेंच कीं तें लवकर पाठ होतें. अशा गाण्यांतील सहज स्मरणांत राहिलेली एखादी तरी ओळ तो दिवसभर गुणगुणत असतो व त्या तंद्रींत तो आपले व्यवसाय करीत असतो.

काव्यापासून सर्वसाधारण अशी निर्भेळ आनंदाची प्राप्ति होते; तथापि मनुष्याचें वय, आवड व बौद्धिक दर्जा यामुळें काव्याच्या अंतर्बाह्य रचनेंत व विषयांत वैचित्र्य आलें आहे. म्हणूनच मुलांचें काव्यवाङ्मय निराळें व प्रौढांचें निराळें—असा भेद पडतो. ज्यांत त्यांच्या परिचित वस्तूंचें हुबेहूब वर्णन आलें आहे; अथवा ज्यांत त्यांचाच स्वभाव मार्मिक रीतीनें दाखविला आहे अशा कविता मुलांचें मन तावडतोब वेधून घेतात; पण ज्यांत गहन विषयाचें वर्णन केलें आहे, कल्पनांचीं चित्रविचित्र जाळीं रचून चमत्कृति उत्पन्न केली आहे, निरनिराळ्या रूपकांनीं एखादें तत्त्वज्ञान विशद केलें आहे, पारमार्थिक व वैराग्यपर विचार ज्यांत डोकावताहेत अशा तऱ्हेच्या कविता प्रौढांसच रुचतात— अभ्यसनीय वाटतात. मुलांचा बौद्धिक दर्जा पाहतां अशा कविता त्यांना झेपणार नाहींत. मुलांची आकलन शक्ति ठराविक मर्यादेपर्यंत असते, त्यांची जिज्ञासा जसजसी तृप्त होईल तसतशी ती वाढत जाते. मनुष्याच्या स्वभावास योग्य वळण लागणें, त्याच्या आवडी निवडी ठरणें, मनावर चांगले संस्कार घडणें, हृदयांत उचित रसिकता निर्माण होणें इ. मनुष्याचें शील बनविणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टी बाळपणांतच होणें शक्य असतें. ल्हान रोपटें जसें वाकवावें तसें वाकतें. म्हणून मुलांची योग्य जोपासना करणें, त्यांच्या मानसिक विकासास मदत करणें हें जसें आईबापांचें कर्तव्य आहे; त्याचप्रमाणें त्यांच्या वयाला अनुरूप त्यांना समजेल, आवडेल, अशा तऱ्हेचें वाङ्मय त्यांच्यासाठीं निर्माण करणें हेंही कवींचें व लेखकांचें कर्तव्य आहे.

मुलांची जिज्ञासाशक्ति केवढी प्रबळ आहे ! त्यांच्या चौकस स्वभावाचें कौतूक मानून त्याचें परिपोषण करणें हें किती अवश्य आहे याचें यथार्थ वर्णन रे० टिळकांनीं ‘लेकरांची जिज्ञासा’ या उदात्तरम्य कवितेंत केलें आहे. मूल वडिलांस नेहमीं ‘ हें काय हो ? ’ असें विचारीत असतें. गोविंदाग्रजांनीं म्हटल्याप्रमाणें जणूं काय सगळें जग त्याला ‘प्रश्नचिन्हांकित’ दिसत असतें. वंगकविसम्राट् रवींद्रनाथ ठाकूर मुलांची ही विलक्षण जिज्ञासा पाहून आपल्या ‘ अष्टमीचा चंद्र ’ या नितांत मधुर शिशुकाव्यांत म्हणतात, ‘ जिज्ञासू मुला, हा सबंध पृथ्वीचा गोल फळासारखा तोडून अलग तुझ्या हातांत देऊं काय ?’ सारांश त्यांची ही जिज्ञासा कौतुकास्पद असून ती तृप्त करण्याचें काम बालवाङ्मय अधिक यशस्वीपणानें करूं शकतें. या श्रेयाचा वाटा काव्यवाङ्मयाकडे पुष्कळसा जातो.

गाण्याची मोहिनी अजब आहे. कारण तें गेय असल्यानें त्याचें सूर मुलांना अधिक प्रिय होतात. भाण्डें वाजवून नुसता नाद उत्पन्न केला तरी तान्हें मूल उगें होऊन कान देऊन ऐकूं लागतें. माझ्या बगड्याऽरे, येऽग गाई; चांदोबा चांदोबा भागलास कां? अशा अतीशय साध्या ओळी बहीण किंवा आई सुरांत घोळ घोळून म्हणूं लागतांच रडत असलेल्या मुलाची समजूत होऊन तें हंसूं लागतें. कित्येकवेळां अशा गाण्यांना कांहीं अर्थ नसतो. ‘ औडक चौडक दामाडू ’ इ. अर्थशून्य गाणींही मुलें केवळ नादलुब्ध होऊन म्हणत असतात. अर्थशून्य गाणीं ऐकून मुलें जर खूष होतात तर नादमधुर आणि सार्थ गाणीं त्यांना वाचावयास दिल्यास किती हर्ष होईल हें सांगावयास नको. विषयास अनुरूप चाल, सोपी व मधुर भाषा, बालभावनांना गुदगुल्या करील अशा तऱ्हेचा अर्थ इ. साहित्य जर त्यांत एकवटून आलें तर तीं गाणीं — त्या कविता मुलांच्या स्मरणांत राहून ‘कवितावाचन’ म्हणजे आनंदप्राप्तीचें साधन असा अनुभव-

जन्य परिणाम त्यांच्या हृदयावर झाल्याखेरीज राहणार नाहीं.

मुलांच्या शिक्षणक्रमांत 'कविता' हा महत्त्वाचा विषय आहे. प्राथमिक अगर दुय्यम शिक्षणाच्या शाळांत सुद्धां मुलांना ज्यायोगें चांगल्या काव्याची ओळख होईल अशी कविता शिकवली जात नाहीं— निदान अल्प प्रमाणांत शिकविली जात आहे. शाळेंत मुलांना 'कवितेचा तास' कण्टाळवाणा वाटतो हा दोष त्यांचा नाहीं — तो दोष क्रमिक पुस्तकांतील कवितांकडे व शिक्षकांच्या शिक्षणपद्धतीकडेही जातो. ज्या काळांत इयत्तावार क्रमिक पुस्तकें तयार केलीं गेलीं त्या काळीं निर्माण झालेल्या वाङ्मयाच्या मानानें व त्या वेळच्या शिक्षण-तज्ज्ञांच्या समजुतीप्रमाणें झालेली कवितांची निवड योग्य असेल, पण आतां काळ बदलला आहे. आणि आज जशी प्रत्येक गोष्टींत सुधारणा झाली आहे त्याचप्रमाणें इंग्रजी वाङ्मयाच्या निकट सान्निध्यानें व अभ्यासानें मराठी वाङ्मयाच्या प्रत्येक अंग उपांगांत स्पृहणीय उत्कर्ष दिसून येत आहे. आज आधुनिक कवींच्या हातून जें काव्यवाङ्मय निर्माण होत आहे त्यांतून मुलांसाठीं कविता निवडून काढून त्यांचा समावेश क्रमिक पुस्तकांत करणें अत्यंत अवश्य झालें आहे. त्याशिवाय आधुनिक काव्याची ओळख त्यांना कशी होणार ?

मुलांचें अभ्यासाकडे लक्ष लावण्यास शिक्षकांना कवितेसारखें सोपें साधन नाहीं. आङ्ग्ल महाकवि रॉबर्ट ब्राउनिंग याची 'गारुडी' नांवाची फार सुंदर कविता आहे (सुप्रसिद्ध कवि भास्करराव तांबे यांनीं या कवितेचें रूपांतर केलें आहे तें वाचावें) - एका गारुड्यानें गांवांतील सर्व उपद्रवी उंदीर पुंगीच्या आवाजानें गोळा करून गांवांबाहेर नेलें, पण ठरलेलें बक्षिस गांवकऱ्यांनीं त्याला न दिल्यामुळें तो रागारागानें त्याच पुंगीच्या आवाजानें गांवांतील सर्व मुलें गोळा करून, त्यांना आपल्या बरोबर घेऊन जाऊं लागला— इत्यादि; सारांश शिक्षकास जर आपण गारुड्याची उपमा दिली तर 'कविता' ही

मराठी

त्याची पुंगी मुलांना आपोआप भुरळ पाडून शाळेंत अणिण्याचें काम करील. शिक्षकांना कवितेचा उपयोग अशा तऱ्हेनें करून घेतां येण्यासारखा आहे. याचकरितां मुलांच्या हातांत देण्यास योग्य अशा कवितासंग्रहाची जरूरी आहे.

विद्यार्थी शाळेंत ज्या कविता शिकतात, त्यांतील बऱ्याच कविता रचनेनें दुर्बोध व बेडौल असतात. त्यांचे विषयही रुक्ष, ठराविक उपदेशपर, इसापनीतींतील गोष्टीप्रमाणें तात्पर्यदर्शी, कण्टाळवाणे असे असतात. बिचाऱ्या मुलांनीं आधीं त्यांतील कठीण शब्दांचा अर्थ पाठ करायचा, नंतर अन्वय लावायला शिकावयाचें, मग त्याचा अर्थ लावायला पहावयाचा आणि शेवटीं त्यांच्या हातांत रुक्ष उपदेशाचा भोपळा पडावयाचा! या सर्व अवस्थांतून जाईतोंपर्यंत विद्यार्थी रडकुण्डीस व मेटाकुटीस आल्याशिवाय कसा राहील? 'कविता' म्हणजे मनोरंजनाचें साधन म्हणावयाचें व ती शिकवितांना त्यांचा असा हिरमोड करावयाचा, यासारखी शोचनीय गोष्ट ती कोणती? यामुळें 'कविता' म्हणजे एक त्रासदायक विषय आहे असा त्यांच्या मनाचा ग्रह होऊन ते मोठेपणीं कवितेचा उघड उघड द्वेष करतात, मग चांगलें काव्य जाणण्याची रसिकता त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली नाहीं यांत त्यांचा काय दोष? सारांश, मुलांकरितां चांगलें गद्यपद्यात्मक वाङ्मय तयार होणें अवश्य आहे.

मराठी भाषेंत अशा तऱ्हेचें काव्य वाङ्मय फार थोडें आहे. मात्र अलीकडे तें वाढत्या प्रमाणांत असून चांगले कवीसुद्धां यांत लक्ष घालूं लागले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. लहान मुलांचीं जीं मासिकें आहेत, त्यांतून बऱ्याच कविता प्रसिद्ध होतात, पण त्यांतील फारच थोड्या कविता 'मुलांसाठीं कविता' अशा यथार्थ शब्दानें संबोधण्यासारख्या असतात. मुलांकरितां कविता लिहिणें—बालगीत लिहिणें ही गोष्ट खरोखर सोपी नाहीं. ती एक कला आहे.

चार दोन ओळी खरडल्या कीं बालगीत तयार झालें असें कवींना वाटत असल्यास तें चुकीचें आहे.

मूल हट्टास पेटून खळीला येतें, तेव्हां त्याची समजूत घालतां घालतां पोक्त व अनुभविक माणसें देखील कधींकधीं रंजीस येतात. याचें कारण मुलांचा स्वभाव व त्यांची मनोभूमिका ही पुष्कळ वेळा समजत नाहीं, हेंच होय. मुलांच्या स्वभावरेखनपर कविता लिहिणें कठीण आहे, त्याचें कारण हेंच. याकरितां कवीला सूक्ष्मस्वभावनिरीक्षण व मुलाचें मन आत्मप्रत्ययानें जाणण्यासाठीं थोडेंबहुत 'मानसशास्त्राचें ज्ञान' अवश्य असायला पाहिजे. इतर काव्य-प्रकारांसाठीं कवीची जी विशिष्ट तयारी लागते, स्फूर्ति लागते, प्रतिभा लागते, तीच 'बालगीत' लिहितांनाही असावी लागते; अर्थात् हा काव्य-प्रकार कांहीं कवींना साधेल, कांहींना साधणार नाहीं. विशेषतः स्वभाव-निदर्शक कविता लिहितांना कवीनें नाट्यगीताचा आधार घेणें फार उत्तम. स्वतःची भूमिका सोडून त्यानें प्रत्यक्ष मूल बनावयास पाहिजे. बाळपणांत प्रवेश करावयास पाहिजे. केशवसुत म्हणतात त्याप्रमाणें 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणाऱ्या' कवीला हें साधायला पाहिजे; एरव्हीं त्याला निर्मळ बालगीत लिहितां येणार नाहीं.

मासिकांतून 'मुलांसाठीं कविता' या सदराखालीं ज्या कविता असतात, त्या बहुधा 'मुलांना उद्देशून' असतात. मुलांना पाहून कवीला स्वतःच्या बाल्यदशेची झालेली आठवण आणि त्यायोगानें सबंध कवितेंत पसरणारी एक विरह-छटा, 'तेहि नो दिवसा गताः' अशासारखे खेदोद्गार, इ० प्रकार अशा कवितांत पहावयास मिळतात. पण या कविता वाचून मुलांना काय आनंद होणार? आतां 'मूल व बालपण' यांचाच ज्यांत संबंध आला आहे, त्या मुलांकरितां कविता अशी समजूत होणें चुकीचें आहे. आवडते पशुपक्षी, फुलें, झाडें, निसर्गांतील सुंदर दृश्यें, नित्य परिचित वस्तु, खेळ, खेळांचीं गाणीं,

अंगाई-गीतें, इ० विविध विषयांवरही कविता लिहून त्यांत वैचित्र्य यावयास पाहिजे. कवीला कविता लिहिण्याचा सराव असल्यामुळें बालगीतें कवींनींच लिहिणें जास्त चांगलें. शाळांतून शिक्षकांना पुरवणी कविता शिकविण्याचा प्रसंग येतो, आणि तशा कविता संग्रहीं नसल्यामुळें, त्याचप्रमाणें पुस्तकें व मासिकें इ० साधनें जवळ नसल्यामुळें—अलीकडे ही उणीव तितकी भासत नाहीं—शिक्षकालाच मारून मुटकून कवि बनावें लागतें. कोणती तरी उपदेशपर गोष्ट घेऊन आर्या अगर अशाच ठराविक चालीच्या विटाळांतून बाहेर पडलेल्या त्या पद्यमय गद्याची दुर्दशा विचारूंच नये. मुलांना अशा कविता कितपत आवडत असतील, हें सांगावयास नकोच. याचकरितां मुलांचें काव्यवाङ्मय नामांकित कवींनीं तयार करायला हवें.

इंग्रजी भाषेंत जेथें अगदीं सामान्य विषयावरहि हजारों पुस्तकें लिहिलेलीं आपण पाहतों, तेथें अत्यंत महत्त्वाच्या अशा काव्यविषयक बालवाङ्मयाचें वैपुल्य असल्यास नवल नाहीं. प्रस्तुत काव्य-संग्रहासारखीं ‘मुलासाठीं कवितांचा सुवर्णनिधि, शिशुगीतसंग्रह, अंगाईगीतें, बाळपणावरचीं गाणीं,’ इ० नांवांनीं चमकणारीं कवितांचीं शेंकडों सचित्र व सुंदर पुस्तकें आहेत. टेनिसन, वर्डस्वर्थ, ब्लेक, स्टीव्हन्सन, वाल्टर द ला मेअर, हूड, मिसेस् ब्राउनिंग् व मिसेस् हीमन्स, रवीन्द्रनाथ ठाकूर, इ० नामांकित कवी—कवियित्रींनीं शिशुगीतें लिहिलीं आहेत व तीं अतिशय मधुर आहेत. निवळ मुलांसाठीं कविता करणारे कवि तिकडे कितीतरी आहेत ! आपल्याकडे या विषयाला वाहून घेतलेले असे प्रो. मायदेव, प्रि. कारखानीस, ना. गं. लिमये, प्रो. वेहेरे इ० थोडेच कवि आहेत.

मराठी भाषेंतील बालवाङ्मयाच्या इतिहासाकडे पाहिल्यास जें कांहीं निर्माण झालें आहे व होत आहे तें अर्वाचीन काळांतच. प्राचीन कवींपैकीं संतकवींनीं, विशेषतः नामदेव, एकनाथ, मध्वमुनी

यांनीं गोकुळवासी श्रीकृष्णाच्या बाललीला सुरस रीतीनें आपल्या अभंगांतून व पदांतून वर्णिलेल्या आहेत. 'कुतना थमाल ले थमाल अपुल्या गाई ' हें पेंद्या गवळयाचें गाणें नामदेवानेंच रचलें आहे. मुलांना कळेल व आवडेल असें एवढेंच प्राचीन काव्यवाङ्मय. त्यापेक्षां स्त्रियांच्या जिभेवर वर्षानुवर्ष तगत आलेलें घरगुती ओवीवाङ्मय फार सरस आहे. घरोघर मुली त्या ओव्या तन्मय होऊन म्हणत असतात, पण उत्तरोत्तर या ओव्यांचाही विसर पडत चालला आहे. आधुनिक काळांत मुलांसाठीं सुबोधवाङ्मय निर्माण करणारे पहिले थोर गृहस्थ म्हणजे प. वा. वि. कों. ओक हे होत. त्यांचे 'बालबोध' मासिक त्या काळांत फार नांवाजले होते. ओक, लेंढे, मोगरे, खरे इ. कवींची कविता प्रामुख्यानें प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या परिचयाची आहे. तो काळ, वाङ्मयाची स्थिति, इंग्रजीवाङ्मयाचा नुकताच होऊं लागलेला परिणाम या गोष्टी लक्षांत घेतां त्यांनीं ज्या बालबोध कविता लिहिल्या, त्याबद्दल त्यांचें आपण ऋणीच आहोंत. मात्र आज ती कविता जुनी वाटत आहे. चांगली बालगीतें लिहिण्याचा क्रम सुप्रसिद्ध कवि रे. टिळक, दत्त, बालकवि व तांबे यांनीं सुरू केला. बालबोधमेवा व आनंद या मुलांच्या मासिकांतून त्यांच्या फार सुंदर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. बालबोध, बालबोधमेवा, आनंद, शालापत्रक, वऱ्हाड शाळापत्रक, सुमन, विद्यार्थी, खेळगडी, बालोद्यान, प्रमोद इ. मुलांसाठीं निघणाऱ्या मासिकांनीं बालवाङ्मयांत चांगली भर टाकली आहे. त्यांतील आनंदासारखीं कांहीं मासिकें अद्यापिही नियमित निघून बालवाचकांची चांगली करमणूक करीत आहेत. बालवाङ्मयाचे प्रमुख पुरस्कर्ते कै. वासुदेव गोविंद आपटे, संपादक 'आनंद', यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें मी माझें कर्तव्य समजतों. त्यांनीं निर्माण केलेल्या वाङ्मयाबद्दल बालसृष्टि त्यांना निरंतर दुवा देत राहील यांत शंका नाहीं. उत्तमोत्तम कविता व गाणीं यांच्या

प्रकाशनास उत्तेजन आनंदादि मासिकांनींच प्रामुख्यानें दिलें आहे.

मुलांकरितां काव्यसंग्रह मराठींत थोडेच आहेत, त्यांचा नामनिर्देश खालीलप्रमाणें:— ( या ठिकाणीं मनोरंजन माहे आगस्ट १९२३ च्या अंकांत आलेल्या श्री. ना. गं. लिमये यांच्या काव्यविषयक बालवाङ्मय या उपयुक्त लेखाचा आधार घेतला आहे )

१ मुलांसाठीं गाणीं— मिस मेरी भोरकृत ( हल्लीं दुर्मिळ ); २ सोपीं गाणीं भाग १-२ —बाळकृष्ण दिनकर कल्याणकरकृत; ३ मुलांचीं गाणीं-ना. के. बेहेरेकृत; ४ शाळेंतील गाणीं-ना. वि. आपटेकृत; ५ नवीन बालगीत—ना. गं. लिमयेकृत; ६ मुलांकरित कविता—म. का. कारखानीसकृत; ७ कांहींतरी ( विद्यार्थि आवृत्ति )—ह. स. गोखलेकृत; ८ बालोद्यान गाणीं—प्रकाशिका मिस एमिलीबाई बिसेल; ९ मुलांकरितां गोड गाणीं—आनंदकार्यालय, १० वासंती—संग्राहक, वि. स. सुखठणकर.

बालशारदेंतील कवितांचा उपयोग किती वयापर्यंतच्या व कितव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलांमुलींकरितां होईल हें निश्चित सांगणें अर्थातच शक्य नाहीं. साधारणतः ८ ते १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना व प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या पुस्तकांतील कविता कळूं शकतील असा संग्राहकाचा विश्वास आहे. सर्वसाधारण कोणाहि वाचकास यांतील कविता वाचून आनंद होईल अशा तऱ्हेचीच निवड प्रस्तुत संग्रहांत केली आहे. पुस्तकांतील कवितांचा क्रम आधीं सोप्या मग अवघड असा धरला आहे, तथापि साकल्यानें पाहिल्यास सर्वच कविता कमी अधिक प्रमाणांत सोप्या आहेत. कविता लिहितांना कवीला बरीच बंधनें पाळवयाचीं असतात म्हणून एखादा दुसरा कठिण शब्द येणें व एखादी ओळ दुर्बोध रचली जाणें साहजिक असतें; पण ही दुर्बोधताहि शेवटीं दिलेल्या टीपा वाचल्यास खात्रीनें दूर होईल. मुलांना चित्रें फार आवडतात म्हणून कवितां-

तूनच दोन निवडक प्रसंग शोधून त्यांवर चित्रें काढविलीं आहेत. मुलांना तीं फार चित्ताकर्षक वाटतील. बहुतेक कविता लहान आहेत त्यामुळें त्यांना त्या म्हणतांना कंटाळवाण्या वाटणार नाहींत.

मुलांनीं कविता वाचतांना तिचा अन्वय लावूं नये--शिक्षकांनींहि ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. एखाद्या शब्दाचा अगर ओळीचा अर्थ समजला नाहीं तरी चालेल — त्याकरितां टीपा आहेतच. कविता सबंध वाचून तिच्यांतील स्वारस्य अनुभवण्याचा प्रयत्न करावा. गेय चालीवरच्या ज्या कविता व गाणीं आहेत त्यांची चाल शिक्षक अगर वडील माणसें यांजकडून समजावून घ्यावी व मग त्या म्हणाव्या. कवितांच्या चाली बहुतेक परिचयाच्या आहेत.

खालीं दिल्याप्रमाणें वर्गवारी पडून विविधता व वैचित्र्य प्राप्त होईल अशा तऱ्हेनें बालशारदेंतील कवितांची निवड केली आहे.

१ प्रात:कालसंबंधीं;

२ मुलांच्याच कल्पना व भावना ज्यांत व्यक्त झाल्या आहेत अशा कविता;

३ मुलांचे आवडीचे विषय, वस्तू व खेळ यांचीं वर्णनें ज्यांत आलीं आहेत अशा;

४ सृष्टींतील चमत्कारांविषयीं मुलांच्या कल्पना ज्यांत आहेत अशा;

५ सृष्टींतील वर्णनें सोप्या भाषेंत केलेलीं आहेत व जीं वाचून मुलांच्या हृदयांत निसर्गप्रेम उत्पन्न होईल अशा;

६ मुलांमुलींनीं म्हणावयास योग्य अशीं गाणीं;

७ मुलांच्या स्वभाव-निदर्शक कविता — यांतच विनोद उत्पन्न होईल अशाहि कविता आहेत;

८ अंगाईगीतें — वात्सल्यप्रेम जागृत करणाऱ्या कविता;

९ राष्ट्रीय व ऐतिहासिक कविता.—आपल्या राष्ट्राविषयीं, पूर्वजांच्या इतिहासाविषयीं व भाषेविषयीं प्रेम व अभिमान उत्पन्न होईल अशा तऱ्हेनें राष्ट्रीय कवितांची निवड केली आहे.

बालवाचकांनो, बालशारदेंतील कवितांच्या योगानें तुम्हांला आल्हाद वाटावा व तुम्ही त्या गोड गळयावर म्हणाव्या असा संग्राहकाचा संकल्प आहे, तो सिद्धीस गेला असें समजल्याखेरीज त्याला समाधान वाटणार नाहीं. कळीचें फूल झालेलें पाहणें व लहान मुलांच्या मनाचा विकास झालेला पाहणें यासारखें दुसरें सुंदर व मनोहर दृश्य नाहीं.

येथें माझें हृद्गत संपलें. शेवटलें आभारप्रदर्शनाचें कर्तव्य करून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

कविवर्य केशवसुत यांच्या कवितेबद्दल श्री. पी. सी. दामले, वकील श्रीगोंदे, रे. टिळकांच्या कवितांबद्दल श्री. दत्तोपंत टिळक, वकिल नाशिक, गोविंदाग्रजांच्या कवितेबद्दल श्री. शंकरराव गडकरी वकील, बालकवींच्या कवितांबद्दल श्री. बाबूराव ठोंबरे व गोपाळराव अधिकारी, कुंटे यांच्या कवितेबद्दल श्री. अधिकारी, माधवानुजांच्या कवितेबद्दल श्री. चिंतामणराव मोडक, वकील कल्याण, दत्तांच्या कवितांबद्दल श्री. विठ्ठलराव घाटे, अॅड० ऑफिसर नगर; सौ० लक्ष्मीबाई बेहेरे यांच्या कवितेबद्दल प्रो. ना. के. बेहेरे, या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों; त्याचप्रमाणें ज्यांनीं आपापल्या कविता प्रस्तुत संग्रहासाठीं घेऊं दिल्या त्या सर्व कवींचा मी अत्यंत आभारी आहें.

पुस्तकासाठीं केलेली कवितांची निवड योग्य आहे हें पाहून गु. गिरीश, प्रो० मायदेव, बाबूराव जगताप, हेडमास्तर शिवाजी मराठा हायस्कुल; प्रि. म. का. कारखानीस, व मुंबईच्या म्युनिसिपल शाळांचें सुपरिंटेंडेंट श्री. ना. गं. लिमये यांनीं मला उत्तेजन दिलें म्हणूनच 'बालशारदा' प्रकाशनांत येत आहे. पुस्तक तयार होत असतांना माझ्या सर्व मित्रमंडळींनीं आपलेंच काम समजून मला बहुमोल मदत

केली. सुप्रसिद्ध चित्रकार सावंत यांनीं सुबक चित्रें काढून दिलीं, मुंबईच्या सुविख्यात नेरॉय कंपनीनें चित्रांचे ब्लॉक काळजीपूर्वक तयार करून दिले, आर्यसंस्कृति मुद्रणालयाचे मालक गु. प्रो. वासुदेवराव परांजपे यांनीं कौतुकानें पुस्तक सजविण्याची मनापासून मेहनत घेतली. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

बालशारदेचे सर्वस्वीं प्रेरक, माझे परमपूज्य तीर्थरूप 'दादा' यांचा वत्सल आशीर्वाद घेऊन बालशारदा बाहेर पडत आहे. शेवटीं ज्याच्या कृपेनें या अंगीकृत कार्यांतून मला निर्वेधपणें पार पडतां आलें त्या दयाघन परमेश्वरास प्रणिपात करून मी आपली रजा घेतों.

**फर्ग्यूसन कॉलेज, पुणें,**
ता. ३।२।३०

**गणेश हरी पाटील**

## शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | ४ | वरें | वरं |
| १४ | ५ | मीं | मी |
| १४ | ८ | मीं | मी |
| २६ | ८ | खार | स्वार |
| ३२ | १३ | झुंजझुजुनी | झुंजझुंजुनी |
| ५१ | ६ | पुढें न जाण्याची | पुढें जाण्याची |
| ५१ | १६ | कटक्षामध्यें | कटाक्षामध्यें |
| ५१ | २० | नन्नादीं | तन्नादीं |
| ५७ | २ | म्यानांतील | म्यानांतिल |

# अनुक्रमणिका


| अनुक्रम नंबर | कवितेचें नांव | पान |
|---|---|---|
| १ | श्रीशारदावंदन | १ |
| २ | विद्याप्रशस्ति | २ |
| ३ | सृष्टीची शाळा | ३ |
| ४ | सूर्यास नमस्कार | ३ |
| ५ | वारा | ५ |
| ६ | रामाचा हट्ट | ६ |
| ७ | माझा भाऊ | ७ |
| ८ | अ आ ई | ८ |
| ९ | चिमणी | ९ |
| १० | पाखरांची शाळा | १० |
| ११ | वेडा चांदोबा | ११ |
| १२ | बोलत कां नाहीं | १२ |
| १३ | माझी धाकटी बहीण | १३ |
| १४ | चला सुटी झाली | १४ |
| १५ | तान्हें रोप | १५ |
| १६ | उत्सवाहून परतल्यावर | १६ |
| १७ | एंजिनवाला | १७ |
| १८ | आजारीपण | १८ |
| १९ | दिवाळीचा सण | १९ |
| २० | पाळणा | २० |
| २१ | कोंबडा | २१ |
| २२ | पाऊस | २२ |
| २३ | माझी बाहुली | २३ |
| २४ | भोंवरा | २४ |
| २५ | द्वाड मनी | २५ |

केली. सुप्रसिद्ध चित्रकार सावंत यांनीं सुबक चित्रें काढून दिलीं, मुंबईच्या सुविख्यात नेरॉय कंपनीनें चित्रांचे ब्लॉक काळजीपूर्वक तयार करून दिले, आर्यसंस्कृति मुद्रणालयाचे मालक गु. प्रो. वासुदेवराव परांजपे यांनीं कौतुकानें पुस्तक सजविण्याची मनापासून मेहनत घेतली. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

बालशारदेचे सर्वस्वीं प्रेरक, माझे परमपूज्य तीर्थरूप 'दादा' यांचा वत्सल आशीर्वाद घेऊन बालशारदा बाहेर पडत आहे. शेवटीं ज्याच्या कृपेनें या अंगीकृत कार्यांतून मला निर्वेधपणें पार पडतां आलें त्या दयाघन परमेश्वरास प्रणिपात करून मी आपली रजा घेतों.

फर्ग्यूसन कॉलेज, पुणें,
ता. ३।२।३०

गणेश हरी पाटील

## शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | ४ | वरें | वर |
| १४ | ५ | मीं | मी |
| १४ | ८ | मीं | मी |
| २६ | ८ | स्वार | स्वार |
| ३२ | १३ | झुंजझुजुनी | झुंजझुंजुनी |
| ५१ | ६ | पुढें न जाण्याची | पुढें जाण्याची |
| ५१ | १६ | कटक्षामध्यें | कटाक्षामध्यें |
| ५१ | २० | नन्नादीं | तन्नादीं |
| ५७ | २ | म्यानांतील | म्यानांतिल |

# अनुक्रमणिका


| अनुक्रम नंबर | कवितेचें नांव | पान |
|---|---|---|
| १ | श्रीशारदावंदन | १ |
| २ | विद्याप्रशस्ति | २ |
| ३ | सृष्टीची शाळा | ३ |
| ४ | सूर्यास नमस्कार | ३ |
| ५ | वारा | ५ |
| ६ | रामाचा हट्ट | ६ |
| ७ | माझा भाऊ | ७ |
| ८ | अ आ ई | ८ |
| ९ | चिमणी | ९ |
| १० | पाखरांची शाळा | १० |
| ११ | वेडा चांदोबा | ११ |
| १२ | बोलत कां नाहीं | १२ |
| १३ | माझी धाकटी बहीण | १३ |
| १४ | चला सुटी झाली | १४ |
| १५ | तान्हें रोप | १५ |
| १६ | उत्सवाहून परतल्यावर | १६ |
| १७ | एंजिनवाला | १७ |
| १८ | आजारीपण | १८ |
| १९ | दिवाळीचा सण | १९ |
| २० | पाळणा | २० |
| २१ | कोंबडा | २१ |
| २२ | पाऊस | २२ |
| २३ | माझी बाहुली | २३ |
| २४ | भोंवरा | २४ |
| २५ | द्वाड मनी | २५ |

| | | |
|---|---|---|
| २६ | खार | २६ |
| २७ | रानपाखरा | २७ |
| २८ | जरा तरी बघ हंसून | २८ |
| २९ | सायंकाळ | २९ |
| ३० | वाघ्या | ३० |
| ३१ | चिमणा श्रीकृष्ण | ३२ |
| ३२ | झिम्मा | ३३ |
| ३३ | सुशीला | ३५ |
| ३४ | आतां गडि फू दादाशीं ! | ३६ |
| ३५ | श्रावण महिन्याचें गाणें | ३८ |
| ३६ | आई | ३९ |
| ३७ | रानांत एकटेंच पडलेलें फूल | ४१ |
| ३८ | हलवा | ४२ |
| ३९ | झोका | ४४ |
| ४० | आनंदी आनंद | ४५ |
| ४१ | खेड्यांतील आनंद | ४७ |
| ४२ | सृष्टीचें गायन | ४९ |
| ४३ | तगरीचें फूल | ५० |
| ४४ | बालशिवाजी | ५१ |
| ४५ | बालसंभाजी | ५२ |
| ४६ | 'हें शिर लववेना मातें' | ५३ |
| ४७ | सदरेंतील पैजेचे विडे | ५६ |
| ४८ | आमुची मायबोली | ५८ |
| ४९ | श्रीमहाराष्ट्रगीत | ५९ |
| ५० | मावळगीत | ६१ |
| ५१ | श्रीशिवराजस्तोत्र | ६२ |
| ५२ | प्रियकर हिंदिस्तान | ६४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४२३८

# बालशारदा

## श्रीशारदावन्दन

झंपा

नमन मम तिज असो माउली शारदा ॥ ध्रु० ॥

विमल हृदयापरी
धवलवसनांकिता
मधुर चन्द्रापरी
स्मितमुखी सर्वदा ॥ १ ॥

घेइ वीणा करीं
गाउनी सुस्वरीं
नाद मंगल भरी
स्थिरचरीं कामदा ॥ २ ॥

रामचरितांबुजीं
आदि कवि मधुप तो
गुंगुनी रंगुनी
प्रगटवी तोषदा ॥ ३ ॥

तीच शुभदायिनी
आर्यभूनन्दिनी
स्नेहमन्दाकिनी
होउ अजि सौख्यदा ॥ ४ ॥

आनंदगीत भाग ३

आ. कृ. टेकाडे.

# विद्याप्रशस्ति

(वृत्त – कामदा)

असुनि जीभही, ज्याचियाविना
मौन लागतें घ्यावया जना,
काय तें बरें ? बोलिजे खरें--
ज्ञान तें बरें ! ज्ञान तें बरें ! १

सम्पदा किती जीपुढें पडे,
शक्तिचें जिच्यावांचुनी नडे,
कोण ती बरें ? सांगिजे खरें
शारदा बरें ! शारदा बरें ! २

दुःखहेतु ते दूर घालवी,
वसुमतीस जी स्वर्ग भेटवी,
भगवती अशी सांग कोणती ?
ती सरस्वती ! ती सरस्वती ! ३

केशवसुत

## सृष्टीची शाळा

(चाल – बाळपणाचा काळ सुखाचा)

पहाट होतां सूर्य उघडितो सुंदर सृष्टीची शाळा,
'कुकूकू' अशी घंटा देतो पहा कोंवडा हा छकुला. १

'विठू ऊठ रे, विठू ऊठ रे' पोपट मारितसे हांका.
मांजर बोले त्या शाळेला 'म्यांव म्यांव' मी येऊं का ? २

'भो भो' ऐसे शब्द तुम्हांला कुत्रा पाठ म्हणूनी दावी.
'चिव चिव' ऐशी कविता खाशी घोकितसे चिमणाबाई. ३

'कक्का किक्की' ही बाराखडि म्हणतीं बदकें या वेळीं,
उठा मुलांनो, अभ्यासाला लवकर या प्रातःकाळीं. ४

ना. गं. लिमये.

---

## सूर्याला नमस्कार

सूर्य सकाळीं । उगवुनि वेळीं
सगळ्या लोकांना उठवी
आळस टाकुनि । आपआपलें
काम करायाला शिकवी
हे उपकार । होती फार
सूर्याला हा नमस्कार १

पक्षी उठती । किलबिल करिती
मंजुळशीं गाणीं गाती
फूलपाखरें । मध जमवाया
इकडुनि तिकडे उडतातीं
हे उपकार । होती फार
सूर्यालागीं नमस्कार २

कुणी आळशी । अंथरुणाशीं
चिकटुनि लोळत जे निजती
खिडकींतूनी । हात घालुनी
उठवि जागवुनि त्यां वरती
हे उपकार । होती फार
सूर्या देवा नमस्कार ३

गाइगुजीला । चरावयाला
सोडि गुराखी कुरणांत
पेन्सिल पाटी । घेउनि जातीं
मुलेंहि शिकण्या शाळेंत
हे उपकार । होती फार
सूर्या माझा नमस्कार ४

फुलांस फुलवी । फळास पिकवी
रोग घालवी उजेड दे
शक्ति बुद्धि दे । सदा तयांला
ज्यांची त्यावर भक्ति जडे
हे उपकार । होती फार
सूर्या माझा नमस्कार ५

वि. कृ. नेरूरकर.

[stamp]

# वारा !

( चाल – नदीच्या पैलारु । दामाजी सोनारु )

नदीच्या शेजारीं । गडाच्या खिंडारीं
झाडांच्या ओळींत । वेळूंच्या जाळींत
दिवसा दुपारीं । जांभळी अंधारीं
मोडकें देऊळ । त्यावरी पिंपळ
कोण गे त्या ठायीं । रहातें गे आई ?

चिंचांच्या शेंड्यांना । वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी । कोण गे पालवी ?
कोण गे जोरानें । मोठ्यानें मोठ्यानें
शीळ गे वाजवी ? । पाखरां लाजवी !
सारखी किती वेळ । ऐकूं ये ती शीळ ! २

वाळलीं सोनेरी । पानें गे चौफेरीं
मंडळ धरोनी । नाचतीं ऐकोनी !
किती मीं पाहीलें । इतुकेंची देखीलें—
झाडांच्या साऊल्या । नदीत कांपल्या !
हाका मीं मारिल्या । वाकोल्या ऐकिल्या ३

उरांत धडधडे । धांवतां मी पडे
पळालों तेथून । कोण ये मागून ? ४

भा. रा. तांबे

# रामाचा हट्ट

(चाल – भूपती खरे ते–०)

कार्तीक पौर्णिमा, रम्य निशा समयाला
कौसल्या दावी पूर्ण चंद्र रामाला ।
चंद्रमा पाहुनी रामचंद्र मग हंसले,
'खेळण्या चंद्र दे' हट्ट धरोनी बसले ।
समजावी माता त्याला । बहुपरी
मग मुरली वाजविण्याला । दे करीं
परि तृप्ती नच रामाला । अंतरीं
'सोनुल्या ! उगी तूं, सुबक बाहुली घेई'
'बाहुली नको मज चंद्र खेळण्या देई' ॥ १ ॥

'मज चंद्र खेळण्या देई' ऐसे बोलें
खेळणें टाकुनी गडबड भूवर लोळे !।
बहु समजुत करिती, खेळ देउनी नाना
ना क्षणभर थांबे रामचंद्र रडतांना ।
अंकावरि माता त्याला । घेउनी
पाचारी प्रिय नाथाला । धाडुनी
सेवक, तो सत्वर गेला । धावुनी
तो जाउनि सांगे सर्व वृत्त राजाला
मग दशरथ राजा झडकरि तेथें आला ! ॥ २ ॥

कुरवाळी राजा हृदयीं धरुनी त्याशीं
'तुज काय जाहलें ? सांग असा कां रडसी ?।
आकाश फोडुनी चंद्रसूर्य तुजसाठीं
आणीन खेळण्या, मग कां होशी कष्टी ?'।

'द्या, मला चंद्र खेळाया। आणुनी
आरसा आणवी राया। त्यांतुनी
चंद्राची मग त्या छाया। दावुनी
आनंदित केलें रामाला रायानें
प्रतिबिंब पाहुनी नाचे तो हर्षानें ॥ ३ ॥

सौ. लक्ष्मीबाई वेहेरे.

## माझा भाऊ

(चाल – भक्ति ग वेणी)

पाहत राहूं। गोजिरा ग माझा भाऊ
केव्हां हंसतो केव्हां रडतो
हात पहा हा कसे हलवितो,
घेतो कांहीं टाकुनि देतो
कां रे भाऊ। तुज कडेवरी का घेऊं ॥ १ ॥
बाहुलि का खेळाया व्हावी ?
लबाड कांहीं बोलत नाहीं
हांसत हांसत कैसा पाही
गाणें भाऊ। रमविण्या तुला का गाऊं ?
पहा कसा हा आई हंसतो
माझे केस कसे बघ धरितो
लागलीच मग सोडुनि देतो.
चल रे भाऊ। खेळण्यास आपण जाऊं ॥ २ ॥

बालकवि.

# अ आ ई !

( चाल — तुम्ही चला हो वरमायी )

मोत्या शीक रे अ आ ई
सांगूं कितीतरि बाई ॥ धृ० ॥
दादा आई म्हणताती,
अ आ ई ई कठिण किती
तुजला कधीं न येइल ती;
म्हणुं दे कोणी कांहीं
शीक रे अ आ ई. १

यू यू ये ये जवळ कसा,
गुप्‌चुप् येथें बैस असा,
ऐक, ध्यान दे, शीक तसा;
धडा पहिला घेई
शीक रे अ आ ई. २

म्हणतां तुजला येत नसे,
शिकविन तुज येईल तसें,
अ आ ई ई भुंक कसें;
कां रे भुंकत नाहीं ?
शीक रे अ आ ई. ३

दच.

# चिमणी !

चिंव चिंव चिमणी छतांत – छतांत
आरसा लोंबे भिंतीला – भिंतीला
चिमणी पाहे सवतीला – सवतीला
भरभर आली रागांत – रागांत !

एकः– ' चिउताइ चिउताइ ! काय बघतां – काय बघतां ?'
दुसरीः– ' टच् टच् चिउताइ काय करितां – काय करितां ?'
तिसरीः– ' ती तर तुमची पडछाया – पडछाया !'
चौथीः– ' उगीच शिणतां कां वाया – कां वाया ?'
एकः– ' फुटेल कांच '
दुसरीः– ' दुखेल चोंच '
तिसरीः– ' पडेल खोंच
चोंचीला – चोंचीला '
चौथीः– ' काय होईल सवतीला – सवतीला ?'
साऱ्याजणीः– ' टाळया वाजवुं या चट्चट् ! – या चट्चट् !
पाउलें फिरवुं या पटपट् ! – या पटपट् ! '
भुर्र चिमणी उडाली – उडाली
छतांत जाऊन दडाली – दडाली !

भा. रा. तांबे

# पाखरांची शाळा

(चाल – वेलीमध्यें वेल कोमल)

पाखरांची शाळा भरे पिंपळावरतीं
चिमण्यांचीं पोरें भारी गोंगाट करतीं ! ।
उतरतें ऊन, जाते टळुनी दुपार
पारावर जसा यांचा भरतो बाजार ! ।
बाराखड्या काय आई ! घोकती अंगणीं ?
उजळणी म्हणतीं का जमुनी रंगणीं ? ।
तारेवर झोके घेतीं बसूनी रांगेंत
भुर्रकन इथें तिथें उडतीं मौजेंत ।
खेळकर मुलें, नको कराया अभ्यास
परीक्षेंत कां न आई ! व्हायचीं नापास ? ।
लक्ष यांचें पांगलेलें पेरूच्या बागेंत
मास्तरच यांना हवे आमुचे रागीट ! ।
पावसाळ्यांतही शाळा आमुची न गळे
गळकी ग शाळा यांची भिजती सगळे ।
रविवारीं सणवारीं आमुच्यासारखी
यांना नाहीं सुटी, भली मोडली खोड कीं ! ।
यांच्याहून आम्ही आई शहाणे, नव्हे का ?
गप्प शाळेमधीं, कधीं धरितों न हेका. ।
होतों पास आम्ही, देती दिपोटी बक्षीस
मौज काय सांगू ? मिळे सुट्टीही शाळेस ! ॥

गणेश.

मराठी १८

# वेडा चांदोबा !

आई, चांदोबा पहा
मला वाटे वेडा हा !
काय असा धावतो
पुन्हा पुन्हा हंसतो !
जातां बागेमधीं मी
येतो पाठीमागुनी १

चांदण्यांना सोडूनी
माझ्याकडे धावुनी–
येतो कां हा नकळे !
वघ तयाचे चाळे !!
सांज होतां, मजशी
कोठें जाऊं न देशी ! २

फिरे कसा एकटा
भीति नाहींच कां त्या ?
कां ग वागूल बोवा
आकाशांत नाहीं वा ?
फटींतुनी दाराच्या
दिसतसे रात्रीचा ! ३

रात्रभर खेळतो
सांग केव्हां झोपतो ?
खेळे आईवेगळा
ऐसा द्वाड कां झाला ?
माझ्यासवें खेळाया
आई, बोलाव तया !! ४

ग. बा ताम्हणे.

# बोलत कां नाहीं ?

( चाल – कृष्ण गडी अपुला. )

बोलत कां नाहीं । झालें काय तुला बाई !
चोळी परकर नवीन केले,
दागदागिने सर्व घातले,
चूल बोळकें जवळ मांडिलें,
दिलें सर्व कांहीं । तरी तूं बोलत कां नाहीं ? १

आई तुजला रागें भरली ?
कीं दादानें खोडी केली ?
रुसली माझी बाळ सोनुली,
काय करूं बाई ? गडे तूं बोलत कां नाहीं ? २

सांग तुला का भूक लागली ?
देउं काय मी लाटुन पोळी ?
रुसूं नको, घे ही बघ झाली
छकुले ! ये खा ही । गडे ! तूं बोलत कां नाहीं ? ३

शेजारिण वेणुचा बाहुला,
नवरा तुजला आज पाहिला,
म्हणुनि लाजुनी धरिशि अबोला ?
ओळखलें बाई । नको तूं सांगु नको कांहीं ! ४

दच.

# माझी धाकटी बहीण

(दिंडी)

बहिण माझी धाकुली कुसुमताई
अझुनि वरषाची जाहलीच नाहीं
कुसुम माझी आनंद मला देई
मला तिजविण मुळिं चैन पडत नाहीं १

केस भरभर उडतात जावळाचे
ओठ हसरे ते लाल किती तीचे
गाल दिसती ते फुलें गुलाबाचीं
बाहुली ही जणुं सुबक दिसे साची २

कुसुम माझी बोबडे गोड बोले
जपुनि टाकी पाउलें हळू चाले
कधीं मजला लटकाचि खाउ देई
कधीं निजवी होवोनि मला आई ३

बूक माझें घेवोनि कधीं हातीं
कुसुम बसते, डोलांत वाचते ती
कधीं रागावे रुसुनि दूर जाई
खेळ खेळे ती अशी कुसुमताई ४

कधीं शाळेंतुनि भाउ परत येई
वाट माझी पाहात बसे ताई
घरीं येतां उचलोनि तिला घेतों
फुलें पक्षी तिस मौज दाखवीतों ५

म. का. कारखानीस

# चला सुटी झाली !

(चाल — मला मुंबईला—)

चला, सुटी झाली आतां खूप खूप खेळायचें ॥ धृ० ॥
मी मोटारवाला । तुम्ही गांवा चला
मी पैसे घेउन बसवायचें
मी पों पों करित पोंचवायचें ॥ १
मीं बनेन इंजन । शिटी जोरांत फुंकीन
तुम्हि सर्वांनि डबे बनायचें
तुम्हि ओळींत मागून चालायचें ॥ २
मीं बनेन चोर । तुम्हि शिपाइस्वार
मीं लपुन छपुन निसटायचें
तुम्हि शोधुन मला पकडायचें ॥ ३
मी होईन भट । पोथी सांगेन झट
तुम्हि मला तूप वाढायचें
मीं तट्ट अस्सं चालायचें ॥ ४
मी शाळामास्तर । तुम्हि मुलें शिकणार
मीं पेटिंत आंत शीरायचें
तुम्हि एकदम् उभें राहायचें ॥ ५
मिळुन करूं नाटक । सोंगें सजवून झक
मध्यें नाहीं कुणीं हंसायचें
नाहीं नाहीं बरें भांडायचें ! ॥ ६

वा. गो. मायदेव.

## तान्हें रोप.

(चाल–आनंदी आनंद गडे)

लहानसें होतें बीज
आंत तयाच्या घे नीज— ।
बाळ चिमुकलें तें तान्हें
सृष्टीचें गोजिरवाणें ।
पाळण्यांत झोके घेई
रजनी त्या गाणीं गाई ॥ १ ॥

प्रभात होतां रवि बोले
"पहा तान्हुल्या जग खेळे ।
उठ, पाळणा तूं सोड
जगतांशीं मैत्री जोड ।
शुभ्र रुपेरी तेजांत
ऊठ, बैस गाणीं गात" ॥ २ ॥

मोत्यांचा पाउस पडला
बाळाला उठवायाला ।
द्रव-बिंदूंच्या स्पर्शानें
पुलकित झालें तें तान्हें :
वरती मग आपोआप
आलें तें तान्हें रोप ॥ ३ ॥
बघतां तें गोजिरवाणें
फुलली सृष्टी हर्षानें ।

रवि खेळे, वारा नाचे
पल्लव गळले वृक्षांचे।
सर्व बोलले बाळाला
"हो तूं पुढतीं वृक्ष भला" ॥ ४ ॥

ना. के. बेहेरे.

## उत्सवाहून परतल्यावर

(चाल—भूपति वैभव सारखी)

आइ ! आइ ! होइन मी खलाशि बंदरवाला
तूं येशिल का ग आजोळीं जायाला ?।
आइ ! आइ ! होइन मी बोटीचा कप्तान
तूं येतां सोडिन बोट शीट फुंकून !।
आइ ! आइ ! होइन मी लक्ष्मण छकडेवाला
तूं येशिल का ग देवाच्या जत्रेला ?।
आइ ! आइ ! होइन मी विदुषक टाळेवाला
तूं येशिल का ग नाटक तें बघण्याला ?।
आइ ! आइ ! फुगडि मी घालिन हंडीखालीं
तूं खेळशील ना फुगडी माझ्याजवळीं !।
"आइ ! आई ! येशिल ?" म्हणते "हो हो," आई !
नयनांत लोटली तोंच अहा अंगाई !।

वा. गो. मायदेव

# एंजिनवाला

(चाल—फुलांचा झेला०-)

वाटतें मजला । व्हावें कीं एंजिनवाला ॥ ध्रु० ॥

भक्‌भक् करीत एंजिन चाले,
पृथ्वी सारी कैशी हाले,
त्याच्यामागें डब्बे गेले,
या सर्वांचा । राजा हा एंजिनवाला ! १

स्टेशन सुटतां एंजिन रडतें,
श्वास सोडुनी अश्रु गाळितें,
म्हणुनी त्याला मारी वेतें,
नेत शाळेला । मास्तर हा एंजिनवाला ! २

किती कोळसा एंजिन खाई,
त्यांतुनि थोडा चाखुनि पाही,
म्हणुनी ऐसा काळा होई !
भावंडाला । भिवविल हा एंजिनवाला ! ३

मौजेनें हा शिट्या वाजवी,
दूर दूर हा गाडी पळवी,
कुणी न यावर परी रागवी,
म्हणुनी मजला । आवडतो एंजिनवाला ! ४

ना. के. बेहेरे.

# आजारीपण !

(एका अजाण मुलाची समजूत)

( चालः-भाव धरा रे )

पडूं आजारी ? । मौज हीच वाटे भारी ॥ धृ० ॥
लागेल न जावें शाळेला
काम कुणी सांगेल न मजला
किंबहुना होतिल सेवेला— तत्पर सारीं ।
मिळेल सांजा, साबूदाणा
खडिसाखर, मनुका बेदाणा
'संत्रीं, साखरलिंबू आणा— जा बाजारीं' ।
भवतीं भावंडाचा मेळा
दंगा थोडा जरि कुणि केला
मी कावुनि सांगेन तयाला— 'जा बाहेरी !' ।
आज्ञा जन मानितील माझी
झटतिल ठेवाया मज राजी
बसेल गोष्टी सांगत आजी— मज शेजारीं ।
असलें आजारीपण गोड
असुनी कण्हती कां जन मूढ ?
हें मजला उकलेना गूढ— म्हणून विचारीं ' ।

भानुदास.

# दिवाळीचा सण

(चाल—जाऊं कामाला०)

आली दिपवाळी । गड्यांनो । आली दिपवाळी ॥ धृ०॥

रोज रोज शाळा—पुरे ती आला कंटाळा
चार दिवस आतां—मनाला कसली ना चिंता
उडूं बागडूं जशीं पांखरें स्वैर अंतराळीं. १

मौजेनें न्हाऊं—कपाळीं लाल गंध लावूं
अलंकार लेवूं—करोनी थाटमाट जेवूं
लाडु करंज्या शंकरपाळे खाऊं कडबोळीं. २

खेळगडी नाना—जमवुनि खेळूं खेळांना
बांधुनिया किल्ले—करूं या त्यांवरती हल्ले
भावी पुरुषार्थाचे, कित्ते गिरवूं या काळीं. ३

नळे-चंद्रज्योती—फटाके फुलबाज्या वाती
दारुकाम सोडूं—धडाधड बार नवे काढूं
उडवूं बंदुक लटोपटीची घालुनिया गोळी. ४

खेळाचा धंदा—येतसे भरती आनंदा
फारच गमतीचे—खरोखर दिवस दिवाळीचे
तुच्छ त्यांपुढें कडीं आंगठ्या कंठी भिगबाळी. ५

माधवानुज.

## पाळणा

(चालः—नंदाच्या घरीं आनंद झाला.)

तान्हुल्या बाळा ! बाजीव बाळा
हातापायाचा चालीव चाळा
स्वैर खेळाया आनंदपाळा
प्रेमाचा घे हा झोका वेल्हाळा,
जो जो रे जो जो १

उडते वागडते केश हे कुरळे
फिरते वावरते सतेज डोळे
भाळीं नभींचा चंद्र झळाळे
लागेल बाळा दृष्ट न कळे,
जो जो रे जो जो २

कोवळ्या पिवळ्या सायंकिरणांचा
'सोन्याचा' माझ्या साज सोन्याचा !
नभांगणींच्या शुभ तारकांचा
शोभे कटीला गोफ बाळाचा !
जो जो रे जो जो ३

टाकीन अशी मी ओवाळून !
त्रिभुवनें ही बाळावरून !
बन्सीधर हा जीवाचा चांद
पुरवीन याचे मी छंदफंद !
जो जो रे जो जो. ४

वा. भा. पाठक.

8230
मराठी ग्रंथ संग्रहालय

# कोंबडा

( दिण्डी )

कुणा आवडतो मोर पिसाऱ्याचा
असे कोणाला छंद कोकिळेचा
कुणी असतो नादिष्ट पोपटाचा
मला आहे परि नाद कोंबड्याचा

किती माझा कोंबडा पेटदार
चाल त्याची किति वरें डौलदार !
शिरोभागीं सर्वदा तुरा हाले
जणूं जास्वंदी फूल उमललेलें २

पंख सुंदर चिमुकले रंगदार
चोंच त्याची कितितरी वांकदार
अर्धपायीं पांढरीशी विजार
गमे विहगांतिल बडा फौजदार ३

" उठा, मूर्खांनो झोप काय घेतां
अरुण उदयाचा काल असे आतां
करा कांहींतरि आळसा त्यजून "
उषःकालीं सांगतो ओरडून ४

किती माझा कोंबडा हो शहाणा
लोककल्याणा झटतसे पहा ना !
मोर, पोपट कोकिळा, राजहंस
हवा यांचा बडिजाव तरि कशास ? ५

अती परिचय जाहला कौवड्याचा
म्हणुनि करतां कां मानभंग त्याचा ?
जरी आवडला नाहिं तो तुम्हांला
परी वाटे प्रिय माझिया मनाला ६

दत्तप्रसन्न कारखानीस.

## पाऊस

(एक लहान मुलगा पाऊस पडतांना पाहून आपल्या आईस म्हणतो)

(चाल—बाळा जो जो रे)

पाउस कोठुनि हा। गे पडतो। हळुंहळुं कां झिरपी तो।
फुटलें का टाकें। पाण्याचें। भरलेलें जें वरचें।
कोणीं फोडियलें। जाउनिया। धीर कसा हो हृदया।
न दिसे जातांना। वर कुणिही। चोरुनि कां तो जाई।
टाक्यामधिं पाणी। परि कोणीं। टाकियलें येथोनी।
बरोबरी कैसें। त्या नेलें। कुणीं न का अडवियलें।
म्हणुनी जल नदिचें। कमि झालें। उगाच म्हणती सुकलें।
गरीब त्या रविला। दोष किती। मूर्ख लोक देताती।
सोडुनि चोराला। संन्यासी। असे देति कां फांसीं।
परंतु तें टाकें। स्थिर कैसें। आकाशीं गे बैसें।
आकाशच उलटें। टांगियलें। बघतों आपण सगळें।
आई हें कोडें। मजसि पडे। उकलुन झणिं सांग गडे।

आनंदगीत भाग १ ला.

आ. कृ. टेकाडे.

# माझी बाहुली

(छन्दः—उपचन्द्रकान्त)

नाना, बाहुली माझी
बघा कोनाड्यामाजीं
तिला पराची गादी
तिची रेशमी साडी
तिला जरीचा काठ
बघा राणीचा थाट
शोभे श्रीमन्ती हिला
रङ्ग महालीं निळा
नाहीं चढेल हट्टी,
हिची कोणाशीं गट्टी ? १

तोण्ड पाहून लाजे
फूल गुलाबी ताजें
दात कुन्दाच्या कळया
गालीं सुन्दर खळया
काळे टपोर डोळे
भारी लाडिक भोळे
नाक चाफ्याची कळी
ओठ दोन पोवळीं
शब्द दिसती ओठीं
पण अबोल मोठी ! २

ठेवा एकटी घरीं
धीट आनन्दी परी
थोथो काजळ घाला
पाणी नाहीं डोळ्याला
निजे पुढ्यांत माझ्या
कधीं वाजेना वाजा
पोर गुणाची खाणी
व्हावी कुणाची राणी ?
पण अजून बाई
मोठी होत कां नाहीं ? ३

माधव जूलियन्

# भोंवरा

( चालः–शारदे, दासकामदे )

भोंवरा, फिरे गरगरा, पहा हा जरा
विसांवा नाहीं, विसांवा नाहीं,
त्या कितीहि फिरवा, थकवा येइ न कांहीं. १

खिळयाचें टोंक, तयावर झोंक, पाहुनी रोंख
कसा सांभाळी, कसा सांभाळी
शावास भोंवऱ्या ! कमाल केलिस वेळीं २

नाचतो, उभा राहतो, अहा डोलतो !
स्तब्ध कधिं राही, स्तब्ध कधिं राही
मग असें वाटतें, मुळिं तो फिरतच नाहीं. ३

गुंगणें, कोण पण जाणें ! तयाचें गाणें,
जसा कीं भुंगा, जसा कीं भुंगा,
करि गुङ्गुङ् अपुल्याशींच, घालितां पिंगा. ४

आकार, मनोहर फार, कशी ही आर
रंग किति नामी, रंग किति नामी !
तो खिशांत घालुन शाळेंतहि नेतों मी ५

किति तरी, लोभ त्यावरी ! पहातर खरी,
असा फिरवीतों, तसा फिरवीतों,
वरच्यावर फिरवुन, हातावर घेतों तो ६

के. ना. डांगे.

## द्वाड मनी

गुणी आणि अवगुणी—अशी ही द्वाड आमुची मनी !
जशी काय ही बाई कोणी
आली बर्फाच्या देशांतुनि
अंगाला कापूस डकवुनी
मऊ रेशमाहुनी—अशी ही द्वाड आमुची मनी १

डोळे इवलाले लुकलुकती
अधिकच घारेपणांत खुलती
नजर असे पण चोरटी किती !
सदा दंग अंगणीं—अशी ही द्वाड आमुची मनी २

दंग अशी खेळांत तरीपण
गर्का देइल ( तोहि एक क्षण )
आणि काय--ये ध्यानीं मागुन
प्यालि दूध चोरुनी—अशी ही द्वाड आमुची मनी ३

मनी मावशी माझि मांजरी
तुम्हाहून लाडकी कितितरी !
बिलगूं का—पण पळाली दुरी
मला ओरवाडुनी—अशी ही द्वाड आमुची मनी ४

अशी द्वाड तर, गट्टि सोडुं का ?
किंवा थोडें दूध तोडुं का ?
वाळुन ही पण जाइल अक्का
नका बोलुं हिज कुणी—लाडकी जरी द्वाड ही मनी ५

अज्ञातवासी

# खार

( दोहावृत्त )

लहान सुंदर गोजिरवाणी दिसे कशी ही खार
गुलगुलीत हें अंग मजेचें शेंपुट गोंडेदार १
लहान डोळे लुकलुक बघती दृष्टि कितीतरि छान
खुटकन् कोठें सहज वाजलें तरिहि ऐकती कान २
उभें करोनी शेंपुट बैसे ऐटीमध्यें फार
मालकीण ही जणुं रानाची दिसे अशी ही खार ३
सर सर सर सर पळत जातसे रस्त्यांतुनि ही पार
भर भर भर भर तरुवरि चढते शेंड्यावरि ही खार ४
चळवळ चळवळ सदा करी क्षणभर नाहीं स्थीर
स्वस्थ वसाया जरा तरी कुठला इजला धीर ५
क्षणांत वसते शांत जणों चित्र मजेचें छान
क्षणांत पळते कशी पहा उभारोनि ही कान ६
दिवसभरी ही वनीं फिरे फळें जमविते गोड
गोड गोड बहु खाण्याची इजला भारी खोड ७
काम करी ही आनंदें मधेंच खेळे खेळ
दवडी नच ही कधीं मुळीं फुकट आपुला वेळ ८
किती खिळाडू गमतीची सुंदर भारी खार
तुझ्या गुणाला रूपाला नसे गडे गे पार ९
भारी अचपळ जरि असशी गरिब तरी तूं फार
येउन भेटायास वनीं तुजला वारंवार १०

म. का. कारखानीस.

# रानपाखरा !

(चाल — घनश्याम सुंदरा ... अंतरा वगळून)

रानपाखरा, रोज सकाळीं येसी माझ्या घरा
गाणें गाउन मला उठविसी मित्र जिवाचा खरा.
शरीर निळसर, शोभे झालर ठिपक्यांची त्यावरी
सतेज डोळे चमचम करती जणुं रत्नें गोजिरीं १

पाय चिमुकले, पंख चिमुकले, देह तुझा सानुला,
अफाट आभाळांतुन कैसें उडतां येतें तुला ?
रात्र संपतां डोंगर चढुनी वर येतो भास्कर
तूंही त्याच्या संगें येसी गात गात सुस्वर. २

वाट चालुनी संध्याकाळीं रवि सोडी अंबरा
आणि तूंहि मग पंख उभारुन जासी अपुल्या घरा.
सूर्यासंगें जासी येसी सदाकदा कां बरें ?
शेजारीं आहेत काय रे परस्परांचीं घरें ? ३

देह एवढा अपाय कोणी करील तुजला इथें
म्हणून कां तुज रवीबरोबर माय तुझी धाडिते ?
सांगतोस का तिला कसा हा छानदार बंगला ?
होते का रे कधीं आठवण माझी सखया तुला ? ४

तुझ्यासारखें जावें वाटे उडत मजेनें वरी
नेशिल का मज तुझ्या विऱ्हाडीं बसवुनि पंखावरी !
माय तुझी येईल, सूर्यही येइल भेटायला.
मजाच होइल सख्या पाखरा, नेइं एकदा मला ५

गोपीनाथ

## जरा तरी बघ हंसून !

(चाल०—सखे ग सुरेख—)

बघसि कां माझ्यावर रुसून । सानुल्या ।
जरा तरी बघ हंसून ॥ धृ० ॥
करुनिया बिछाना मऊ
पाळणियांत का नीजवूं
आंदळूं हलवुं डोलवूं ? ॥ सानुल्या० ॥ १
कढि भात वरण सोनुल्या
करुं हातिं तुझ्या चिमुकल्या,
फोडुं पाळी करुनि गुदगुल्या ? ॥ सानुल्या० ॥ २
भटो भटो कोकणांत का
घेतला फणस हा पिका,
हा खेळ तुजसि खेळुं का ? ॥ सानुल्या० ॥ ३
धर खारिक उष्टि न दिली
या चिमण्यांनीं चावली
कशि घेसि हातिं ना मुळीं ? ॥ सानुल्या० ॥ ४
अजुन तूं बससि रागवून्
गाल हे तुझे फूगवून्
टाकुं का गट्टि फू करून् ? ॥ सानुल्या० ॥ ५
बाळ तें जरा खुदकन
भासलें हासलें क्षण
ओठाशिं ओठ जुळवून् ॥ नाचली ।
बाळ किती ती हंसून ! ॥ ६

वा. गो. मायदेव

# सायंकाळ

(चाल—नंदाच्या घरीं आनंद झाला)

आकाश अंगणीं रांगत आला
शीण तान्हुल्या भारीच झाला
पाळण्यामाजीं बाळ घातला
सृष्टीमाउली लागे गायाला
जो जो रे जो जो १

बाई ग माझें बाळ गुणाचें,
रांगत होतें तरी केव्हांचें;
लाल दीसती डोळे झोपेचे
नीज रे बाळा नीज सुखाचें
जो जो रे जो जो २

पद्में झांकिले डोळे आपुले,
तुंग तरूही शांत जहाले,
पक्षी गाऊनी निजाया गेले,
वायू तुला हे म्हणूं लागले
जो जो रे जो जो ३

निशामातेच्या अंकीं निजाया,
केव्हांच गेला दिवस राया;
जागुनि जागुनि तापली काया
नीज रे बाळा नीज सखया !
जो जो रे जो जो ४

अंधार झाला, चंद्रहि आला,
भीऊं नको हा दीप लावीला;
भूलोक सारा निद्रिस्त झाला,
केव्हांची तुला म्हणते बाळा !
जो जो रे जो जो ५

आनंदकंदा जगदाधारा !
नीज सुखानें नीज वासरा !
पहाट होतां जाई माघारा,
नीज रे बाळा ! नीज भास्करा !
जो जो रे जो जो ६

दत्त

## वाघ्या

( चालः–राधाधर मधुमिलिंद, जरा बदलून )

सोडुनिया जेजुरी आला रे ! वाघ्या ओटीवरी ॥धृ०॥
डोई त्याच्या मंदिल झळके
लफ्फे मधुनी काढिति डोकें
भंडाऱ्यानें कपाळ झांकें
काळा गंडा करीं ! आला रे ! वाघ्या ओटीवरी १
अंगरख्याला नसतीं वटणें
सुतळीचीं त्याजागिं वेष्टनें
डगला चढवी वर ऐटीनें
पंचा खांद्यावरी ! आला रे ! वाघ्या ओटीवरी २

काखेमाजीं लोंबे झोळी
धोतर लोळें पायांखालीं
भंडाऱ्यास्तव वेळोवेळीं—
हलवी व्याघ्रांवरी ! आला रे ! वाघ्या ओटीवरी ३

कथी भाकितें खोटीं नाटीं
साध्याभोळ्यां फसवी कपटी
पैश्यासाठीं सर्व लटपटी
करितो नानापरी ! आला रे ! वाघ्या ओटीवरी ४

मुखें सारखी चालवि वटवट
पाठीमागें लावी कटकट
मधेंच कडकड चावी मणगट
धरणें दारीं धरी ! आला रे ! वाघ्या ओटीवरी ५

जनांस जमवी वाजुंस चारी
‘ येळकोट ’ करि ‘ जयमल्हारी ’
खंडोबाच्या नांवें फेरी
घरोघरीं हा करी ! आला रे ! वाघ्या ओटीवरी ६

गात पवाडे घंटि वाजवी
खुबीखुबीनें ‘ सवाल ’ सुनवी
‘जा जा’ म्हणतां पाय न हलवी
मिळवी थोडें तरी ! आला रे ! वाघ्या ओटीवरी ७

भ. श्री. पंडित

# चिमणा श्रीकृष्ण

(चालः—चंद्रकांत राजाची कन्या)

चिमण्या गोपी, चिमणीं वत्सें, चिमण्यांचा मेळ
चिमणा कान्हा, गोपहि चिमणे, चिमणेसे खेळ ।
चिमणा भंवरा, चिमणी जाळी, चिमुकलाच चेंडू
चिमणा कृष्ण कन्हैया खेळे चिमणा विटिदांडू ।
चिमणा पितांवर चिमण्या कटिला, चिमणि माळ कंठीं
चिमण्या गोपसमाजीं शोभे चिमणा जगजेठी ।
चिमणी मुरली चिमण्या वोटीं चिमुकल्याच ओठीं
वाजवि चिमणा धावुनि चिमण्या वत्सांच्या पाठीं ।
चिमण्या गोपी चिमणीं मडकीं चिमणें दहिंदूध
चिमणीं पानें मांडुनि भरविति चिमणा गोविंद ।
चिमणीं वत्सें चिमण्या हरिचें चाटतांचि अंग
चिमण्या हातीं त्यां गोंजारी चिमणा श्रीरंग ।
चिमणे वल्लव झुंजझुजुनी थकति वाळवंटीं
चिमणा श्रीहरि कुरवाळी त्यां लावुनि निजकंठीं ।
राज्यहि चिमणें, प्रजाहि चिमणी, चिमुकलाच राजा
देवहि चिमणा भक्तहि चिमणे चिमुकलीच पूजा ।
जन्मा यावें चिमणें व्हावें चिमणा हरि गावा
चिमण्या हृदयीं प्रेमवळानें नित्य सांठवावा ॥

ज. के. उपाध्ये




असो अपुल्या अंगणीं तुळशीच्या वृंदावनीं
तुझ्या माझ्या प्रीतीसंगें — झिम्मा खेळूं ये !

# झिम्मा

झिम्मा खेळूं ये। झिम्मा नाचूं ये-
आकाशींच्या तारेसंगें झिम्मा खेळूं ये॥

अंधारी ही रात्र काळी
कोणी पाहीना मुळींहि
एकटीच अंतराळीं – झिम्मा खेळूं ये।

सप्तऋषींमध्यें सती
बैसलीसे अरुंधती
लाडक्या या आजीसंगें – झिम्मा खेळूं ये।

दुर्दैवाचे प्रेमी जीव
आकाशींचे तारे राव
त्यांच्यासंगें स्वैररंगीं – झिम्मा खेळूं ये।

चांदण्याच्या चंद्रज्योती
हिमगिरी चकाकती
हासऱ्या या ज्योतीसंगें – झिम्मा खेळूं ये।

चवथीची चंद्रकोर
हळू चाले सुकुमार
लाजऱ्या या पोरीसंगें – झिम्मा खेळूं ये।

काळया मेघामागें जाऊं
वीज नाचे, पैज लावूं
नाचऱ्या या पोरीसंगें – झिम्मा खेळूं ये।

दक्षिणेचा झंझावात
रानफुलें उफाळत
झंझावातीं दोघें रंगूं—झिम्मा खेळूं ये ।
पेटे वन चंदनाचें
झोत झाले गगनाचे
ऐशा दिव्य झोतासंगें—झिम्मा खेळूं ये ।

\+ + +

बोलावूं का साऱ्याजणी
यमुनेचें उडे पाणी
पाण्याच्या या मोत्यासंगें—झिम्मा खेळूं ये ।
जाईजुई वेलीखालीं
आकाशींच्या पोरीवाळी
आणी तूं मी एकमेळीं—झिम्मा खेळूं ये ।

\+ + +

कांहीं केल्या कांहीं कोणी
येथें घरीं येत नाहीं
एकटी कां गात गाणीं ?—झिम्मा खेळूं ये ।

\+ + +

असो अपुल्या अंगणीं
तुळशीच्या वृंदावनीं
तुझ्या माझ्या प्रीतीसंगें—झिम्मा खेळूं ये ।

र. द. सरंजामे

# सुशीला

( दिण्डी )

सुशीलेच्या शाळेस सुटी झाली,
मनीं मुलगी ती फार फार धाली;
म्हणे ' आतां भेटेल मला आई,
बाप, भाऊ, प्रिय ताइ आणि माई. १
माय माझी भेटेल मला जेव्हां
आसवांनीं न्हाणील मला तेव्हां;
मुका वावा घेतील कपोलांचा,
हंसुन भाऊ घेईल गालगुच्चा ! २
ताइ माई सारून दुरी खेळ
धावुनीया मज मिठ्या मारितील,
ऊन पाउस हीं जशीं एक होतीं
हंसें रडणें होईल त्याच रीतीं !' ३
वापभावांना हर्ष फार झाला,
मायवहिणींना प्रेमपूर आला;
सहा महिन्यांनीं लाडकी सुशीला
परत आलेली पाहुनी गृहाला. ४
घरामध्यें पाहून त्या मुलीतें
कामधंदा विसरुनी जाय जें तें !
किती वांट्याला येइ ती कुणाच्या ?
किती आईच्या ! ताइमाइ यांच्या ! ५

रात्र सारी गोष्टींत सरुन गेली,
तयां वाटे ती आज अल्प झाली !
उद्यापरवांचें आज हो जहालें !
कधीं न घडे तें नवल घडुन आलें ! ६

अशा आनंदें घालवी सुटीला
मायबापाच्या घरीं ती सुशीला.
नव्या ओव्या, नव तिचे नित्य खेळ,
सदा वाटे तिज थोडकाच वेळ, ७

कुठें शाळा? तेथील त्या प्रतीति ?
उगा स्वप्नासम पुढें येति जाती !
मुलीची त्या रंगली गृहीं वृत्ति
मला जाणें परतून विस्मरे ती ! ८

रे० टिळक

## ‘ आतां गडि फू दादाशीं ’

“ तुझ्या गळां
माझ्या गळां
गुंफूं मोत्यांच्या माळा ! ”
“ ताई, अणखी कोणाला ! ”
“ चल रे दादा चहाटळा ! ”

" तुज कंठी
मज अंगठी "
" अणखी गोफ कोणाला ! "
" वेड लागलें दादाला ! "
" मला कुणाचें ? — ताईला ! "
" तुज पगडी
मज चिरडी ! "
अणखी शेला कोणाला ! "
" दादा सांगूं बाबाला ? "
" सांग तिकडल्या स्वारीला "
" खुसूं खुसूं
गालीं हंसूं
" वर वर अपलें रुसूं रुसूं ! "
" चल निघ, येथें नको बसूं "
" घर तर माझें तसूं तसूं
" कशी कशी
आज अशी
गंमत ताईची खाशी ! "
" आतां गडि फू दादाशीं ! "
" तर मग गट्टी कोणाशीं ? "

भा. रा. तांबे

# श्रावण महिन्याचें गाणें.

( चाल—बाळपणाचा काळ सुखाचा— )

श्रावणमासीं हर्ष मनासी हिरवळ दाटे चोहिंकडे
क्षणांत येतें सरसर शिरवें क्षणांत फिरुनी ऊन पडे. १

वरती बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे ! २

झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे
तरुशिखरावर उंच घरावर पिवळें पिवळें ऊन पडे. ३

उठती वरती जलदांवरतीं अनंत संध्या राग पहा !
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा ! ४

वलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें. ५

फडफड करुनी भिजलें अपुलें पंख पांखरें सांवरिती
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजवाळांसह बागडती ६

खिल्लारें हीं चरती रानीं गोपहि गाणीं गात फिरे,
मंजुळ पांवा गाय तयाचा, श्रावणमाहिमा एकसुरें ! ७

सुवर्णचंपक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला
पारिजातही बघतां भामा, रोष मनींचा मावळला. ८

सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठीं शुद्धमति
सुंदरबाला या फुलमाला रम्य फुलें पत्री खुडिती ९

देवदर्शना निघती ललना हर्ष माइना हृदयांत
त्यांच्या वदनीं ऐकुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत १०

बालकवि.

# आई

( चालः—आनंद कंद ऐसा )

‘ आई ’ म्हणोनि कोणी । आईस हाक मारी
ती हाक येइ कानीं । मज होय शोककारी
नोहेच हाक, मातें । मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणूं मी । आई घरीं न दारीं !
ही न्यूनता सुखाची । चित्ता सदा विदारी
स्वामी तिन्ही जगांचा । आईविना भिकारी. १

चारा मुखीं पिलांच्या । चिमणी हळूच देई
गोठ्यांत वासरांना । ह्या चाटतात गाई
वात्सल्य हें पशूंचें । मी रोज रोज पाहीं
पाहून अंतरात्मा । व्याकूळ हाय होई
वात्सल्य माउलीचें । आम्हां जगांत नाहीं
दुर्भाग्य याविना का । आम्हांस नाहिं आई २

शाळेंतुनी घराला । येतां धरील पोटीं
काढून ठेविलेला । घालील घास ओठीं
उष्ण्या तशा मुखाच्या । धावेल चुम्बना ती
कोणी तुझ्याविना गे । का ह्या करील गोष्टी ?
तूझ्याविणा न कोणी । लावील सान्जवाती ।
सांगेल ना म्हणाया । आम्हां ‘ शुभं करोति ’ ३

ताईस या कशाची। जाणीव कांहिं नाहीं
त्या सान बालिकेला। समजे न यांत कांहीं
पाणी तरारतांना। नेत्रांत वावरे ही
ऐकूनि घे परन्तू। "आम्हांस नाहिं आई"
साङ्गे तसें मुलींना। "आम्हांस नाहिं आई"
ते बोल येति कानीं। "आम्हांस नाहिं आई" ४

आई! तुझ्याच ठायीं। सामर्थ्य नन्दिनीचें
माहेर मंगलाचें। अद्वैत तापसांचें
गाम्भीर्य सागराचें। औदार्य या धरेचें
नेत्रांत तेज नाचें। त्या शान्त चन्द्रिकेचें
वात्सल्य गाढ पोटीं। त्या मेघमण्डळाचें
वास्तव्य या गुणांचें। आई, तुझ्यांत साचें ५

येशील तूं घराला। परतून केधवां गे
दवडूं नको घडीला। ये ये निघून वेगें
हे गुन्तले जिवाचे। पायीं तुझ्याच धागे
कर्तव्य माउलीचें। करण्यास येइं वेगें
रुसणार मी न आतां। जरि बोलशील रागें
ये रागवावयाही। परि येइं येइं वेगें ६

यशवन्त

[library stamp]

## रानांत एकटेंच पडलेलें फूल

( चाल० नृपममता रामावरती. )

वन सर्व सुगंधित झालें
मन माझें मोहुन गेलें । कितितरी !
मीं सारें वन हुडकीलें,
फुल कोठें नकळे फुललें । मज तरी.
स्वर्गांत
दिव्य वृक्षास
बहर ये खास
असें कल्पीलें—असें कल्पीलें;
मन माझें मोहुन गेलें । कितितरी ! १

परि फिरतां फिरतां दिसलें
फुल दगडाआड लपालें । लहानसें;
दिसण्यांत
फार तें साधें,
परी आमोदें
जगामधिं पहिलें – जगामधिं पहिलें
मन माझें मोहुन गेलें । कितितरी ! २

मी प्रेमें वदलों त्याशीं,
'कां येथें दडुनी वसशी । प्रिय फुला
तूं गडे
फुलांची राणी,

तुला गे कोणीं
रानिं धाडीलें-रानिं लावीलें ?'
मन माझें मोहुन गेलें। किति तरी ३
तें लाजत लाजत सुमन
मज म्हणे थोडकें हंसुन
'निवडिलें
प्रभूनें स्थान
रम्य उद्यान
तेंच मज झालें-तेंच मज झालें
मन माझें मोहुन गेलें। किति तरी ४

रे० टिळक

## हलवा

(चालः—भूपती खरे ते)

किति सुरेख हलवा झाला बघ हा आई,
चान्दण्याच जणुं या खालीं आल्या बाई! ।
अपुल्याच सारखा हलवा वरती करिते
ती सृष्टिसती, जग तारा त्यांना म्हणतें! ।
ही आकाशाची कढई उलटी करुन
बघ हलवा करिते निसर्गदेवी छान! ।
निजकरें हालवी हलती तेव्हां सारे
एकादा चुकुनी पडे पहा परभारें. ।

या इतक्या मोठ्या कढईखालीं आंच
द्यायास जणों जातसे सूर्य रात्रीस. ।
स्वर्गांत फारसें नसेल केशर म्हणुनी
हा एकच मंगळ तिनें बनविला जपुनी ! ।
अर्धाच दिसे जाहला हिचा हा हलवा;
किति बारिक दाणे अजून दिसती पाहा. ।
कांहीं वर आले काटे किति तरि छान,
कांहीं वर काटे मुळीं न दिसती जाण ! ।
हा सुंदर हलवा पुरा कधीं व्हायाचा ?
दर रात्रीं बघतां अपुरा दिसतो साचा. ।
कधिं संपवील ही हलवा असला छान ?
कधिं अम्हांस वाटिल ? पडे कशाची वाण ? ।
का पाक संपला असेल तीचा आई ?
मग नवीन कां ही दुसरा बनवित नाहीं ? ।
मज पंख जरी देवानें दिधले असते
जाउनी साखऱ्या दिधला असता तीतें. ।
हे दाणे पटपट जर खालीं पडतील
तर आई, गे ती मौज किती होईल ! ।
ही निसर्ग देवी कोणासाठीं करिते—
हा इतुका हलवा ? गूढ एक हें मातें ! ॥

कुमार यशोद

# झोका.

( खेळ संपल्यावर मुली झोपाळ्यावर बसून पुढील गाणें म्हणत आहेत. )

( छन्द–कोकिळा )

झोका घेऊं या ग । झोका देऊं या
झोक्यासङ्गें माहेराला गात जाऊं या ॥ धृ० ॥
सूर धरुनी वेगळा
गोड गाणें गाऊं गळां
गाण्यासवें आनन्दानें वर पोहूं या । झोका०
संसाराचा पुरे खेळ
आतां करूं हातमेळ
आरामाया विमानांत चला वसूं या । झोका०
विसरूनी ताप सारा
जाऊं वरती भरारा
भराऱ्यांत सङ्गीताचें सूर भरूं या । झोका०
जाऊं नीट उन्चावर
सृष्टी पाहूं डोळाभर
सृष्टीसवें हसूं, खेळूं, बोलूं, नाचूं या । झोका०
येतां घर बाबा आई
भेटतील दादा ताई
प्रेमभरें एकरूप त्यांशीं होऊं या । झोका०

गिरीश

# आनंदी आनंद

आनंदी आनंद गडे
इकडे तिकडे चोहिंकडे
वरती खालीं मोद भरे,
वायूसंगें मोद भरे,
   नभांत भरला
   दिशांत फिरला
   जगांत उरला
मोद विहरतो चोहिंकडे
आनंदी आनंद गडे १

सूर्यकिरण सोनेरी हे
कौमुदि ही हंसते आहे,
खुलली संध्या प्रेमानें
आनंदें गाते गाणें,
   मेघ रंगले
   चित्त दंगलें,
   गान स्फुरलें
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे २

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहतसे,
कुणास बघतें? मोदाला
मोद भेटला का त्याला?

तयामधें तो
सदैव वसतो,
सुखें विहरतो,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे! ३

वाहति निर्झर मंदगती,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे
कोणाला गातात बरे?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे ४

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो
सोडुनि स्वार्था तो जातो
द्वेष संपला
मत्सर गेला
आतां उरला
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे ५

बालकवि

# खेड्यांतील आनंद !

( दिण्डी वृत्त )

फुटे क्षितिजीं तांवडें जों न थोडें
तोंच जागें होतसे सर्व खेडें
तरुण आखाड्याकडे धाव घेती.
वृद्ध भूपाळ्या प्रभुस आळवीती. १

उठुन गृहिणी लगवगा अंगणांत
सडा संमार्जन करित राहतात
आणि वृंदावन कुणी परसदारीं-
नम्रभावें साष्टांग नमस्कारी. २

सानथोरांना समय पहाटेचा
असा वाटे उत्साह उमेदीचा
मींहि मिळुनी त्यांच्यांत गमें जावें
आणि सौख्यीं त्या भागिदार व्हावें. ३

× × ×

सूर्य माथ्यावरि हळूं चढत राहे
पूर्ण शांती खेड्यांत नांदताहे
गांवशीवेच्या वृक्ष साउलीस
वसे कोणी पांथस्थ विसाव्यास. ४

थवा पाण्यावर गुरावासुरांचा
निघे-येई वर लोट तों धुळीचा
नाद कानावर पडे घुंगरांचा
सूर मिसळे त्यामधें पावरीचा ५

मोट सुटली मोकळे बैल झाले
गडी सारे एकत्र जमुन आले !
बसुन पाटाच्या-वाहत्या-कडेला
सोडुं आतां लागले न्याहरीला ६

सान थोरांना समय शांततेचा
असा वाटे श्रमहार करायाचा
मींहि मिळुनी त्यांच्यांत गमें जावें
आणि सौख्यीं त्या भागिदार व्हावें ७

× × ×

ऊन पसरे कोंवळें सोनियाचें
कळस पिवळे शोभती देउळांचे
थवा आकाशीं उडे पाखरांचा
मार्ग धरुनी आपुल्या कोटराचा ८

दावणीशी वासरें ओढ घ्याया
आणि आतां लागलीं हंबराया !
सांज झालेली, सुटे मंद वात
घरामधुनी लागेल सांजवात ! ९

समय सर्वांना हाच विसाव्याचा
एकमेकांना सुखें भेटण्याचा
मींहि वाटे त्यांच्यांत मिळुन जावें
आणि सौख्यीं या भागिदार व्हावें ! १०

वा. भा. पाठक

# सृष्टीचें गायन

( उपजाति – वृत्त )

सृष्टी गमे, संतत गीत गाते। चराचरां गाउन रंजवीते
वसंत गेला फुलवून रानें। गाऊन गेला पिक गोड गाणें १
वारा पुढें धाडुन दूत आला। वसून मेघावरि पावसाळा
दृष्टी नभीं लावुनि 'पावशा' हो। 'या हो!' असा फोडित एक टाहो २
'नक्षत्र लागे मृग' आणिली ही। आनंद-वार्ता मृगकीटकांहीं
महीवरी येति सरी झरारा। विद्युत् नभाला बसवी दरारा ३
हे नाकतोडे सुरवंट टोळ। तृणांतुनी संचरती खुशाल
इथें तिथें हा झुकतो 'चतूर'। जातां धरूं जाइ उडून दूर ४
विचित्र नाना फुलपांखरें हीं। बागेमधें वागडतात पाहीं
वेलींचिया पल्लव-पुष्प-पुंजीं। भुंगे गडी घालति गोड गुंजी ५
पिकें फुलोऱ्यावरि जों न येती। तों जाहली सावध पक्षिजाति
थवे निघाले मधुमक्षिकांचे। पोळें पहा सुंदर हें मधाचें ६
वळीव केव्हां झडपी पिकांस। लहान रोपें मिळती धुळीस,
जातात तों मेघ निघून वेगें। माळावरी ऊनहि रांगुं लागे ७
उभारती जीव धरून शेतें। सारी तदा 'कीटकसृष्टि' गाते
तीं किर्र त्यांचीं परिसून गाणीं। वाटे फुटे या धरणीस वाणी ८
स्थळीं स्थळीं मण्डुक पल्वलांत। ध्वनी अती कर्कश काढतात
परंतु या वेसुर गायनांत। गढून जाते धरणी नितांत ९
खळाळुनी ओहळ वाहतात। गाई गुरें हंबरती मळ्यांत
हवेमधें गोफणिचे 'भिरीरी!'। 'हा हा!!' असे गुंगति नाद भारी १०
खळ्यामधें शेतकरी मजेनें। साधें परि गाइ सुरेल गाणें
हें सृष्टिचें गायन ऐकण्याला। शेताकडी जाउं फिरावयाला ११

**गणेश**

# तगरीचें फूल

( दिण्डी )

फूल तगरीचें सर्वगुणीं साधें
दृष्टि पडतां सहज हें चित्त वेधे
रूप नखऱ्याविण रुचिर कसें पाहीं
डौल नसुनी वेडौल मुळीं नाहीं. १

शुभ्रतेला शुद्धता शोभवीते
मंदतेनें मधुरता सुगंधातें
कसें साधेपण शोभवी गुणांतें
वधुनि घे हें या पाहुनी फुलातें. २

पाकळी ही वांकडी गोजिरीच
नागमोडी ही कडा साजिरीच !
पाकळ्या या नांदती जरी स्वैर
तरी नयनांला दिसत नसे गैर ! ३

अहा ! डेंखावर बिंदु हा कशाचा ?
दुधाचा हा गुटकाच का मुखींचा ?
वृत्ति पाहुनि म्हणणार नाहिं कोण ?
पुष्प सृष्टीचें बाळ हें लहान ! ४

'सुमन' असलें हें आज तुझे पायीं
भक्तिभावें शारदे, तुला वाही
भाव जेथें प्रश्न ना तिथें कांहीं
गुलाबाचा जाइचा जुईचाही ५

हरि सखाराम गोखले

४२३८




नाकेला अन् गुलजार ।
सावळा नि सुंदर भासे

# बालशिवाजी !

(चाल — उद्धवा शांतवन कर जा)

नाकेला अन् गुलजार। सावळा नि सुंदर भासे
कसल्याशा करुनी वेतां। मधुमधून मोहन हासे
इवल्याशा त्याच्या देहीं। सरदारी ऐट विलासे
डोळयांत चमक पाण्याची
न्यारीच नजर दाण्याची
छाती न पुढें न जाण्याची
दुष्टांचा कर्दनकाळ ॥ १ ॥

मावळी जमवुनी वाळें। खेळतो खेळ मर्दानी
अंगरखा कंवरपट्टा। ती इजार तंग तुमानी
लंगोट्या पोरांमधुनी। लष्करी पेरितो वाणी
इवलीशी करिं तलवार
गरिबांचा हा सरदार
भक्तिला पुरा दिलदार
देईल जान वेल्हाळ ॥ २ ॥

प्रत्येक पाउलासरिसा। पारतंत्र्य चुरडुनि टाकी
प्रत्येक कटाक्षामध्यें। चैतन्य नवें हा फेकी
प्रत्येक हालचालीनें। आईची लज्जा झाकी
शिवनेरी किल्ल्यावरलें
हें दृश्य कुठेंसें बोले
नन्नादीं गुंगुनि डोले—
साधुदास, दे करताल ॥ ३ ॥

साधुदास

# बालसंभाजी

(श्लोक)

चिमुकली पगडी झळके शिरीं
चिमुकली तलवार धरी करीं
चिमुकला चढवी वर चोळणा
चिमुकला सरदार निघे रणा १

छबुकडा चिमणा करितो गुण
चिमुकलें धरिलें मग रंगण
दुडदुडा पळतां पळतां पडे
गडबडे रडतां मुख बापुडें २

शिवाजीसही फार संतोष झाला;
उठे, बाळ घेऊं स्वतां तो निघाला
धरी त्यास हातांत घेऊन झेली
महा रम्य खेळे महा-मात झाली ! ३

म. मो. कुंटे

# " हें शिर लववेना माते ! "

" बाळ शिवबा ! तुला आग्रहानें दरबारीं नेलें, पण तेथें तूं सुलतानास सलाम केला नाहीं; ऐकतें ! " असे वीरमाता जिजाईनें विचारल्यावरून बाल शिवाजी म्हणतातः —

( चालः— उद्धवा शांतवन कर जा. )

१

" होतात देउळें नष्ट—होतात देवता भ्रष्ट
धेनु ब्राह्मण ओरडती—धर्मावरती संकष्ट
न्याय नीति उरली नाहीं—सारेच भोगिती कष्ट
हा घोर मांडिला ज्यांनीं
त्यांच्या पुढती जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते !— हें शिर लववेना मातें !

२

तूं सांग !—तुझ्या चरणाशीं—ही तोडुन ठेविन मान !
तूं सांग !—तात चरणाशीं—कापोनी ठेविन मान !!
गोब्राह्मण यांच्याकरितां—खड्गावर ठेविन मान !!!
परि परके सत्ताधारी
गृहिं शिरून झाले वैरी;
बघतांच तयांना भारी—
सक्रोध वृत्ति मम होते — हें शिर लववेना मातें !

३

मी म्हणतां "नाहीं नाहीं"—दरबारीं नेलें आई
जों आंत शिरोनी पाहीं—तों चढून गेली भुवई
मुजऱ्याला हात न वाही—शिर लववूं शकलों नाहीं
हें सिंहासन कोणाचें ?
हें वैभव तरि कोणाचें ?
काहूर मनीं प्रश्नांचें,
अपहारी नृपसत्तेतें – हें शिर लववेना मातें !

४

एकटाच रात्रीं वसतों—जन्मभूमिला आठवतों !
ढळढळा आइ गे ! रडतों—क्षणिं त्वेषानें संचरतों !!
झोपेंत देशबंधूंच्या—दुःखानें दचकुन उठतों !!!
बोलते भवानी "ऊठ !"
बोलते जन्मभू "ऊठ !
धर समशेरीची मूठ ! "
अवमानुन त्या आज्ञेतें—हें शिर लववेना मातें ?

५

देशाचा राजा नाहीं—राजनिष्ठ राहूं कैसा ?
धर्माचा राजा नाहीं—राजभक्त होऊं कैसा ?
उलट्या बोधाच्या गळिं हा—जीवाचा अडके मासा !

ज्या शिरीं भार देशाचा
त्या शिरीं भार धर्माचा
कर्तव्यें वाहायाचा
विसरून देशधर्मातें — हें शिर लववेना माते!

६

स्वाभिमान सुटला ज्यांचा — देशभक्ति सुटली ज्यांची
कुलकीर्तीचा इतिहास — स्मृति देइ न उज्वलतेची
वाढवोत ते ते शोभा — दास्याच्या दरबाराची
'उद्दाम' म्हणो कुणि मातें
कीं करोत उपहासातें
परि जागोनी स्वत्वातें
हिंदद्वेषी तख्तातें — हें शिर लववेना मातें!

७

सुलतान जाहला क्रुद्ध — उमराव जाहले क्रुद्ध
जातिवंत झाले स्तब्ध — जनकही होय हतबुद्ध
परि तुझी आणि अंबेची — शिरिं कृपा असावी शुद्ध
मावळचे जमवुन भाई
स्थापीन मराठेशाही
हालवीन आदिलशाही
बोलतों सत्य जें गमतें — हें शिर लववेना मातें!"

दु. आ. तिवारी

# सदरेंतील पैजेचे विडे

( शिवराज आग्र्याहून निसटून गेले ! ही वार्ता हां हां म्हणतां चोहोंकडे पसरली. त्यांस धरण्यासाठीं औरंगजेब बादशहानें सदरेंत पैजेचे विडे मांडिले. ही कामगिरी एका मराठभाईनें स्वीकारलेली पाहतांच शिवाजी महाराजांबद्दल अभिमान असलेल्या एका तरुणानें त्याच्यावर चालून जाण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. तरुणाची आहुति तेथेंच पडली. पण त्याचे उद्गार मात्र अजरामर झाले ! कथानक काल्पनिक आहे. )

( **चाल**-उद्धवा शांतवन कर जा० )

वादळांत सोसाट्याच्या । शिवराज उडोनी गेले
दिल्लींत सुटे ही वार्ता । दिल्लीश मनीं घाबरले
जरवीचे अरबस्तानी । घोड्यावर काफिर सुटले
यमुनेच्या दुथडीवरुनी
भरधाव चालली वाणी
'तरवेज पाहिजे पाणी
सदरेंत विडे पैजेचे । उचलील खडे जे कोण ?' १

शृंगारुन राजमहालीं । सिंहासन थाटुन राजे—
बैसले, पोंवळीयांचे । लोंबती घोंस, वर साजे—
झुलणारे झुंबर, मोतीं । मानकरी बसले राजे
हनुवटीस डावा हात
उजवा भंवती फिरवीत
दिल्लीश इषारत देत—
'सदरेंत विडे पैजेचे । उचलणार आतां कोण ?' २

सावरीत मंदिल उठले । तों मराठभाई एक
म्यानांतील समशेरीचें । आवेशें उपसित टोंक
नोंक झोक त्यांचा सांगे । 'पिंजऱ्यांतले हे वाघ'
भरदार काढुनी छाती
वदणार शब्द जों पुढतीं
आवाज घुमे तों भंवतीं
'सदरेंत विडे पैजेचे । उचलणार आपण कोण?' ३

घेऊन सशाचे कान । दरबार बघे चौफेरी
सळसळल्या नागावाणी । तरुणाची चमके स्वारी
बघुन त्या दडाल्या वेळीं । लेच्यापेच्या समशेरी
तरवेज उसळुनी पाणी
तें गेलें 'वाघावरुनी'
द्यायास धडा यमसदनीं
'सदरेंत विडे पैजेचे । उचलणार आपण कोण' ४

\+ \+ \+

क्षणभर जरि बादशहाचे । नेत्रद्वय दिपुनी गेले
तरि तेंच तेज तरुणाच्या । अंताला कारण झालें
बोल ते स्वाभिमानाचे । तरुणाचे नच मावळले
वच घुमले ते सदरेंत
घुमतात अजुन कानांत
घुमवीन महाराष्ट्रांत
'सदरेंत विडे पैजेचे । उचलणार आपण कोण?' ५

वा. भा. पाठक

# आमुची मायबोली

( वृत्त – मन्दारमाला )

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे,
नसे बाह्य ऐश्वर्य या माउलीला, यशाची पुढें थोर आशा असे;
न मातब्बरी पञ्चखण्डान्तरीं ती जरी मान्यता पावली इंग्रजी,
भिकारीण आई जहाली म्हणूनी कुशीचा तिच्या तीस केवीं त्यजी? १

जरी मान्यता आज हिन्दीस देई उदेलें नवें राष्ट्र हें हिन्दवी
दिलाचा मराठा मराठीस वंदी हिची जाणुनी योग्यता थोरवी,
असो दूर पेशावरीं उत्तरीं तो, असो दख्खनीं दूर तंजावरीं,
मराठीच माझी म्हणे मायबोली प्रतिष्ठापुनी मूर्ति अभ्यन्तरीं. २

मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्न धर्मानुयायी असूं,
सहिष्णुत्व अङ्गीं पुरें बाणलेलें, हिच्या एक ताटांत आम्ही वसूं;
हिचे पुत्र आम्ही हिचे पाङ्ग फेडूं, वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरीं
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें, हिला वैसवूं वैभवाचे शिरीं ! ३

करंटी दरिद्री नसे जन्मतां ही हिची थोर सम्पत्ति कालोदरीं
पचेना, उपक्षेमुळें राहिलेली, झणीं तीस बाहेर काढूं तरी !
कशाला हवी लूट ? देतील भाषा जगाच्या हिला वाढती खण्डणी–
मराठी असे आपुली मायबोली ! मराठे झिजूं या हिच्या कारणीं. ४

माधव जूलियन

# श्रीमहाराष्ट्रगीत !

( चाल--धन्य शिवाजी )

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा, माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ध्रु० ॥

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ।
अंजनकांचन-करवंदीच्या कांटेरी देशा
वकुलफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ।
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी । नाचतें करीं
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी । वैभवासि वैराग्यासी
जरि पटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ १ ॥

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं ।
तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिचाही
लढवय्या झुंजार डोंगरी तूंच सख्या पाहीं ।
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ... ... ... ॥ २ ॥

तुझ्या भुकेला वरी, नागली आणि कणी कोंडा
वहाण पायीं, अंगिं कांवळी, उशाखालिं धोंडा ।
विळा कोयता धरी दिगंवर दख्खनचा हात
इकडे कर्णाटक हासतसे तिकडे गुजरात ।
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल
तिकडे इस्तंवूल थरारे, तिकडे वंगाल ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ... ... ... ॥ ३ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण विनधोक
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाय रोखठोक ।
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड
हिरडस मावळचा शिवाजी ती पावनखिंड ।
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा
कोंडाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ... ... ...
जरि पटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ४ ॥

गोविंदाग्रज

# मावळगीत

(वृत्त – वसन्त)

भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा
मराठी आमुची बोली, गनीमी आमुचा बाणा
मराठ्यांच्या प्रदेशाचा कणा हा सह्यवन्धारा,
कशाचा पारतंत्र्याला दऱ्याखोऱ्यांत या थारा?
अडाणी मावळे काळे शिपाई हे शिवाजीचे
उभे हे खाम्ब पोलादी मराठी सर्फराजीचे
अशांचा म्होरप्या सर्जा, म्हणूं द्या त्याजला चुव्वा
परन्तू शत्रुचा पाया खणूनी हा करी धुव्वा
निघाला काळ अफझलखां धराया कोवळा पोर
टिकेना राक्षसी माया वघे जों देव सामोर
करी जो स्वत्व रक्षाया तयारी आत्मदानाची
भवानी साह्य हो त्याला, गतीही त्यास मानाची.
शिवाजी दे भवानीला तमाचा पिण्ड दाणीला
पहा की चन्द्र वीजेचा करूनी दाखवी लीला!
गडींचीं वाजतां भाण्डीं उठूनी भाण्डली झाडी
अनाथ म्लेञ्छ सेनेला न सोडी, झोडुनी काढी.
हुडा हा पूर्व वाजूचा पुढारे देत ही ग्वाही
प्रतापी हिन्दुशाहीची इथूनी गाजली द्वाही
स्वराज्यीं हिन्दवी आतां मराठी काळ हा जाणा
भवानी आमुची आई शिवाजी आमुचा राणा

माधव जूलियन

# श्रीशिवराजस्तोत्र

( शिवरायाच्या पायापाशीं एका प्रातःकाळीं बसून म्हटलेलें हें स्तोत्र आहे. )

( वृत्त—भुजंगप्रयात )

दुही माजली, दैन्य आलें कपाळा,
मराठा मनीं लोभला मन्सबीला,
तदा जागवी जो महाराष्ट्र सारा,
नमस्कार माझा तया बालवीरा, १

जिला पाहतां अप्सरेनें लवावें,
तिला पाहतां जो वदे शुद्धभावें,
" जरी लाभतें रूप हें माउलीला,
तरी प्राप्त होतें अहा ! ते अम्हांला " २

जयें यावनी धर्म स्वीकारियेला,
तया हिंदु केलें दिलें आत्मजेला,
न केव्हां दिला अंध रूढीस थारा,
नमस्कार माझा तया कर्मवीरा, ३

असे विप्र हा, शूद्र हा, हा अविंध,
असा ठेविला भेद ज्यानें न निंद्य,
समत्वें तया योजिलें राष्ट्रकाजा,
नमस्कार त्या श्रीशिवाजीस माझा. ४

तपोभूमिका पाहुनी तेथ ठेला,
डुलूं लागला अंतरीं तृप्त झाला,
उपाधी–शतांची स्मृतीही न ज्याला
नमस्कार त्या राजयोगीश्वराला, ५

जरी योजिलें कार्यभार्गी जनांला,
पुढें सिंहसा धावला सर्व वेळां,
उभा टाकला जो स्वयें झुंजण्याला,
नमस्कार त्या श्रेष्ठ लोकाग्रणीला, ६

यशाची जिवाची न पर्वा कशाची,
सदा साधली एक सेवा जियेची,
गुरूच्या पदीं वाहि त्या दौलतीला,
नमस्कार त्या राजसंन्यासियाला ७

नमावें तयांला, स्मरावें तयांला,
सदा आळवावें, भजावें तयांला,
म्हणावें, " महाराज या एक वेळां,
पुन्हां आर्य भू बोलवी आपणांला ? " ८

विठ्ठलराव घाटे

## प्रियकर हिंदिस्तान !

( चाल—थोर तुझे उपकार० )

प्रियकर हिंदिस्तान !
अमुचा प्रियकर हिंदिस्तान !
हा अलंकार हो भूगोलाचा ! यास नसे उपमान !

सर्व सुखाची खाण,
अमुच्या सर्व सुखाची खाण !
हें अभिमानाचें, सौभाग्याचें अमुच्या रम्य निधान !

हे जन्मभूमि ! हें तनमनधन घे तुला !
तव उपकारांना न मिळे कोठें तुला !
हें फिटणें साध्य न आम्हां अति दुर्बलां !

सुखकर तव गे ध्यान !
निरंतर सुखकर तव गे ध्यान !
जो जननीचा, जो जनकाचा गे तोच तुझाही मान !

रे० टिळक

समाप्त

# कवितांवर टीपा.

१ **श्रीशारदावन्दनः**—१ विमल-पवित्र; धवलवसनांकिता-शुभ्रवस्त्र नेसलेली; स्मितमुखी-जिचें हंसतमुख आहे अशी; सर्वदा-नेहमीं. २ स्थिरचरीं-सजिव निर्जीव वस्तूंत, कामदा-इच्छा पुरी करणारी. ३ रामचरितांबुजीं—( रामचरित+अंबुज ) प्रभुरामचंद्राचें चरित्र हेंच कोणी कमळ त्यांत; आदि कवि-वाल्मीकि ऋषि, मधुप-भुंगा, तोषदा-आनंद देणारी. वाल्मीकीनें रामायण महाकाव्य लिहिलें. ४ शुभदायिनी-मंगल करणारी; आर्यभूनन्दिनी-भरतखंडाची कन्या; मन्दाकिनी-नदी; सौख्यदा-सुख देणारी.

२ **विद्याप्रशस्तिः**—प्रशस्ति-प्रशंसा; १ ज्ञान नसेल तर मनुष्य तोंड असून मुका समजावा. २ शारदेपुढें संपत्ति व शक्ति यांचा काय पाड ! ३ विद्या मनुष्यास सुखी करते; पृथ्वीवर स्वर्ग आणते; भगवती-देवी; सरस्वती-विद्या.

५ **वारा**:—जांभळी अंधारी:-दाट काळोख; चौफेरी-चहूंबाजूला.

६ **रामाचा हट्टः**—१ निशा-रात्र, तृप्ती-समाधान; २ अंकावर-मांडीवर; पाचारी-बोलावणें पाठवी; सेवक-चाकर ३ प्रतिबिंब-पडछाया

१५ **तान्हें रोप**:—जमिनींत बीं पेरलें व कांहीं दिवसांनीं तें उगवून त्याचें लहान रोप बनलें याचें सुंदर वर्णन या कवितेंत केलें आहे. १ रजनी-रात्र; २ रवि-सूर्य; जगताशीं-सृष्टीशीं. ३ पुलकित झालें-थरारलें. ४ पल्लव-पानें.

१६ **उत्सवाहून परतल्यावरः** – बाळ आईबरोबर देवाच्या जत्रेला गेलें होतें. तेथें त्यानें निरनिराळे देखावे व चित्रें पाहिलीं, घरीं परत आल्यावर आईच्या मांडीवर डोकें ठेवून तिला तें 'मी अमुक होईन, तमुक होईन' असें सांगूं लागलें पण लवकरच त्याला झोंप आली. नयनांत अंगाई लोटली-डोळ्यावर झोंप आली.

१९ **दिवाळीचा सणः**— १ स्वैर-वाटेल तिकडे; अंतराळीं-आकाशांत; २ अलंकार-पोषाख व डागिने; ३ भावी पुरुषार्थाचे कित्ते गिरवूं-मोठेपणाचे, पराक्रमाचे धडे शिकूं.

**२० पाळणाः**—आपल्या तान्ह्या मुलाला निजवीत असतांना आई हें अंगाई-गीत म्हणते: मुलापुढें आईला सगळें जग–स्वर्गदेखील तुच्छ वाटतो. २ भाळीं–कपाळावर. ३ नभांगणींचाः–आकाशांतील, शुभतारकांचा–सुंदर ताऱ्यांचा, कटीला--कमरेला, ४ वन्सीधर–श्रीकृष्ण, जीवाचा चांद–जिवाचा कालिजा, छंदफंद–कोडकौतुक.

**२१ कोंबडाः**—२ शिरोभागीं–डोक्यावर, ३ अर्धपायीं–गुडघ्यापर्यंत, विहगांतिल–पक्ष्यांमधला; ४ अरुणउदयाचा–तांबडें फुटण्याचा-पहाट होण्याचा; उषःकालीं – पहाटेस; त्यजून–टाकून ५ लोककल्याणा–लोकांच्या हितासाठीं; बाडिजाव--मिजास, ऐट; ६ परिचय–ओळख; मानभंग–पाणउतारा, अपमान.

**२३ माझी बाहुलीः**—१ पराची–पिसाची; शोभे श्रीमंती हिला–महालांत जसा निळा रंग शोभून दिसतो तसा हिला श्रीमंती थाट शोभतो; चढेल–गर्विष्ठ; २ टपोर–मोठाले; लाडिक–गोड, ३ माझ्या पुढ्यांत निजे–मला बिलगून निजते.

**२९ सायंकाळः**— सांज झाली–दिवसभर साऱ्या आकाशांत रांगून हें सूर्यबाळ आतां झोपेला आलें आहे; म्हणून सृष्टी माउली त्याला निजविण्यासाठीं अंगाईगीत म्हणत आहे. आतां हें बाळ रात्रभर निजेल व पहाटेस उठून पूर्व दिशेला जाईल. ३ पद्में–कमळानें; तुंगतरू–उंच वृक्ष, ५ दीप–दिवा; निद्रिस्त झाला–झोपला. ६ जगदाधारः—जगाचा आधार–सूर्य.

**३० वाघ्याः**—व्याघ्रांबरी–वाघाच्या कातड्याची पिशवी, ४ भाकित–भविष्य, ७ 'सवाल' सुनवी–प्रश्न ऐकवी. वाघ्याचें वर्णन किती हुबेहुब आहे पहा !

**३१ चिमणा श्रीकृष्णः**—श्रीकृष्णांनीं बाळपणीं गोकुळांत ज्या लीला केल्या त्यांचें वर्णन पुराणांत फार सुंदर केलें आहे; जुन्या बहुतेक साधुसंत कवींनीं त्यांवर अभंग, ओव्या व पदें रचलीं आहेत. मध्वमुनीश्वरांचें चिमण्या श्रीकृष्णावर असेंच सुंदर गाणें आहे. चिमण्या कृष्णासाठीं जणूं कांहीं गोंव-तालच्या सगळ्या जगानें चिमणें रूप धारण केलें आहे.

वत्सें–वासरें; गोपसमाजीं–गवळ्यांच्या समूहांत; जगजेठी–कृष्ण; वल्लव–गवळी.

**३२ झिम्माः** – हा मुलींचा आवडता खेळ आहे. सोबतचें चित्र पहा – या मुली आपल्या अंगणांत झिम्मा खेळण्यांत किती गढून गेल्या आहेत ! तें तुळ-

शींचें वृंदावन पहा, अ.वाराबाहेर एक देऊळ दिसतें आहे; मुलींच्या डोक्यावर झाडाच्या डहाळ्यांत चतुर्थीची चंद्रकोर दिसते; ती निरखून पहा. हे नि्बंध गाणें किती गोड आहे !–आकाशांतील सगळे तारे झिम्मा खेळायला खालीं उतरताहेत असा भास होतो.

स्वैररंगीं–स्वच्छंद, बेभान होऊन; हिमगिरी--बर्फाचा डोंगर, झंझावात--सोसा ट्याचा वारा; उफाळत--उधळीतो, झोत--फवारा; आकाशींच्या पोरीबाळी--तारा.

३३ सुशीला:—टिळक कवींनीं ' सुशीला ' नांवाचें मोठें काव्य लिहिलें आहे, त्यांतील आरंभींच्या दिण्ड्या येथें घेतल्या आहेत.

२ कपोलांचा–गालांचा ३ अतीशय हर्ष झाला म्हणजे कधींकधीं मनुष्य हसतां हसतां अश्रु गाळतो. याला कवींनीं पावसाळ्यांत एकाचवेळीं दिसणाऱ्या ऊन पावसाची गोड उपमा दिली आहे. ६ अल्प–लहान, उद्यापरवाचा काळ आनंदाच्या भरांत आजच निघून गेला असें त्यांना वाटलें. ७ प्रतीति–अनुभव. सुटी संपताच आपल्याला परत शाळेला जावें लागेल हें सुशीला विसरून गेली. इतकी ती भावण्डाशीं खेळण्यांत, गाणीं म्हणण्यांत गढून गेली आहे.

**३४ आतां गडी फूदादाशीं**:–एक थट्टेखोर भाऊ आपल्या लग्न झालेल्या बहिणीची थट्टा करीत आहे, त्यामुळें ती चिडते. कवितेतील विनोद फार खुसखुशित आहे.

**३५ श्रावण महिन्याचें गाणें**:–१ शिरवे–वळीव पावसाची सर. २ नभोमंडप—आकाशरूपी मांडव, इंद्रधनुष्याला तोरणाची उपमा दिली आहे. ४ जलदावरतीं—ढगावर; संध्याराग–सायंकाळीं ढगांवर निरनिराळे रंग उमटतात त्यामुळें आकाश शोभिवंत दिसतें. ५ बलाकमाला–बगळ्यांची रांग, कल्पसुमें–कल्पवृक्षाची फुलें; अवनीवरती–पृथ्वीवरती, ग्रहगोल–तारे; एकमतें–ओळीनें; पांढऱ्या शुभ्र बगळ्यांची रांग कलकल शब्द करीत नदीच्या पात्रावरून जाते तेव्हां कल्प वृक्षाचीं फुलें उडून जाताहेत अथवा तारे ओळीनें खालीं उतरताहेत असा भास होतो. ८ सुवर्णचंपक—सोनचाफा; विपिनीं—अरण्यांत, भामारोष:—श्रीकृष्णानें स्वर्गांतील पारिजातक वृक्ष पृथ्वीवर आणून सत्यभामेचा रुसवा घालविला अशी पुराणांत कथा आहे. ९ पुरोपकंठीं–गांवाबाहेरील बागांत; शुद्धमति–पवित्र अंतःकरणाच्या स्त्रिया; पत्री–झाडाचीं पानें. १० ललना—बायका; वदनीं—तोंडून.

श्रावण महिन्यांत दिसणाऱ्या सृष्टीच्या शोभेचें फार सुंदर वर्णन बालकवींनीं या कवितेंत केलें आहे.

३६ आई:—बाहेर कोणीतरी आपल्या आईला हांक मारली; आईवांचून पोरक्या झालेल्या मुलानें ती ऐकिली, त्याला एकदम आपल्या आईची आठवण झाली. आपणास आई नाहीं ही जाणीव त्यास होऊन त्याच्या हृदयाला पीळ पडला. १ शोककारी–शोक उत्पन्न करणारी; कुठारी–कुऱ्हाडी, न्यूनता–उणीव, विदारी–घरें पाडते. 'स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी' ही ओळ मुलांनीं हृदयांत कोरून ठेवावी. २ अंतर–मन, दुर्भाग्य–दुर्दैव ५ आईचा मोठे-पणा यांत वर्णन केला आहे. या ओळी नीट समजावून घ्याव्या. नन्दिनी–देवांची धेनू, अद्वैत–सर्व ठिकाणीं सारखा भाव, तापसांचें–ऋषींचें, औदार्य–भलेपणा धरेचे–पृथ्वीचे, मेघमण्डळ–ढगांचा समुदाय; वास्तव्य–वास.आईवर इतकी सुंदर कविता आपल्या भाषेंत दुसरी नाहीं.

३७ रानांत एकटेंच पडलेलें फूल:—२ आमोद—सुवास ४ 'देवानें मला जी स्थिति दिली आहे त्यांतच मी समाधान मानतों' असें तें फूल म्हणालें. टिळक कवींना फुलें व मुलें फार आवडत. वनवासी फूल हें एक त्यांचें अतीशय सुंदर काव्य आहे.

३८ हलवा:—एकादा चुकुनी पडे—तारा तुटून पडतो त्याला उद्देशून; निजकरें—आपल्या हातानें; हा एकच मंगळ—मंगळ–एक आकाशांतील ग्रह, याचा रंग केशरासारखा दिसतो. आकाशांत रात्रीं तारे उगवतात, निसर्गदेवी हा हालवा करीत आहे असें एका मुलीला वाटलें.

३९ झोका:—माहेराला–वर वर मोकळ्या हवेंत, मुलींना माहेरी मोकळेपणा वाटतो. हातमेळ–हाताची गट्टी; एकरूप होऊं--तल्लीन होऊं. झोका उंचावर गेला म्हणजे सृष्टीची मौज पहावयास मिळते.

४० आनंदी आनंद:—१ मोद–आनंद २ कौमुदी–चांदणें ३ निर्झर–ओढा, लतिका–वेली. वृक्षतती–झाडांची ओळ, कूजित–किलबील गाणें, विक-सलें–फुललें ५ सर्व जग आनंदी आहे पण द्वेष करणारीं, स्वार्थी–आप्पलपोटीं जीं माणसें असतात त्यांना हा आनंद कोठून मिळणार ? हृदयांतून स्वार्थ व

मत्सर हे दुर्गुण काढून टाका म्हणजे तुम्ही आनंदी व्हाल. या गाण्याचें पालुपद फार नादमधुर आहे.

**४१ खेड्यांतील आनंद:**—खेडेगावांतील आयुष्यक्रमाचें मनोहर चित्र या कवितेंत रेखाटलें आहे. १ क्षितिजीं–पूर्वदिशेला, गृहिणी–स्त्रिया ४ पांथस्थ-वाटसरू. ७ श्रमहार करायाचा–शीण घालविण्याचा ८ कोटराचा–घरट्याचा; सांजवात–दिवेलागणी.

**४२ सृष्टीचें गायन:**—१ संतत–नेहमीं, पिक–कोकिळपक्षी २ दूत-जासूद, पावशा–पावसाळ्याच्या सुरवातीला ओरडणारा एक पक्षी. ३ मृगकीटक-मृगाचा किडा—याला 'इंद्रगोप' हेंहि नांव आहे, विद्युत्—वीज, ४ तृणांतुनी-हिरवळींतून, चतूर—लांब नांगीचें एक पांखरू. ५ पल्लव–पुष्प–पुंजीं—पानें व फुलें यांच्या झुबक्यांत. ६ पक्षिजाति–पक्ष्यांचा समुदाय, मधुमक्षिका–मधमाशा. ९ स्थळीं स्थळीं-ठिकठिकाणीं; मण्डुक–बेडूक, पल्वलांत–डबक्यांत ध्वनी–सूर; नितांत-पूर्ण. पावसाळ्यांत व हंगामाच्या दिवसांत सृष्टी गात आहे असा भास होतो.

**४३ तगरीचें फूल:**—तगरीचें फूल अतीशय शुभ्र असतें. १ वेधे–ओढ घेतें; रुचिर—सुंदर, डौल–मोहक आकार, बेडौल–वेडेंवाकडें, तगरीचें फूल दिसण्यांत साधें पण नीटनेटकें असतें–मनुष्याचा स्वभाव असाच असावा. ३ नयनांला–डोळ्यांना, गैर–वाईट ४ डेखांवर–देटांवर ५ सुमन–दोन अर्थ ? १ फूल, २ पवित्र मन, भाव–श्रद्धा किंवा भक्ति–देव भावाचा भुकेला असतो.

**४४ बालशिवाजी:**—सोबतचें चित्र पहा. एका डगरीवर हात ठेऊन बालशिवाजी एका दिसण्यांत बावळट पण अंगानें काटक अशा मावळ्या मुलासमोर ऐटींत उभा आहे. शिवाजीचें नाक तरतरीत व चेहरा कसा हसरा आहे, त्याची अंगलट किती बाळसेदार! उभे राहण्याची ढब किती सुंदर आहे! सरदारी बाण्याचा पोशाख त्याला फार शोभून दिसतो ! त्या मावळ्या मुलाच्या चेहऱ्याकडे पहा. तो शिवाजीकडे किती आदरानें व कौतुकानें पहात आहे ! पलीकडे एक किल्ला दिसतो–तो शिवनेरीच आहे. मोठेपणीं याच विश्वासू मावळ्यांच्या मदतीनें शिवाजीनें मराठ्यांचें राज्य स्थापलें. या कवितेंत शिवाजीच्या बालपणाचें अतिशय सुंदर वर्णन

केलें आहे. १ नाकेला-तरतरीत नाकाचा, गुलजार-दिसण्यांत सुरेख, विलासें-शोभते; कर्दनकाळ-शत्रू २ दिलदार-खुल्या दिलाचा, जान-प्राण, वेल्हाळ-लाडका, ३ पारतंत्र्य-गुलामगिरी, कटाक्ष-दृष्टी, चैतन्य-जोर, उत्साह; तन्नादीं-त्या नादांत; साधुदास दे करताल-बाल शिवाजीचें तें सुंदर दृश्य पाहून साधुदास कवीनें आनंदानें टाळी वाजविली. करताल-टाळी.

४५ बालसंभाजीः—कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' या काव्यांतील हा उतारा आहे.

**४६ 'हें शिर लववेना माते'**— शिवाजीस बाळपणीं बापाबरोबर विजापूरच्या दरबारांत जाण्याचा प्रसंग आला. या मानी मुलानें बादशहाला मुजरा केला नाहीं. एके दिवशीं मातोश्री जिजाबाईनीं शिवाजीस याचें कारण विचारलें. या तेजस्वी मुलानें जें बाणेदारपणाचें उत्तर दिलें तें या कवितेंत कवीनें अतिशय उज्वल व स्फूर्तियुक्त भाषेंत गोंवलें आहे. १ संकष्ट—साकडें २ सत्ताधारी—दुसऱ्यावर सत्ता चालविणारे; सक्रोध वृत्ति मम होते—मला अतिशय संताप येतो. ३ राग आला म्हणजे भुवया स्फुरण पावतात. अपहारी नृपसत्ता—जुलमी राजसत्ता. ४ अवमानुन-न जुमानतां ५ उलट्या बोधाच्या गळिं हा—जो देशाचा व धर्माचा राजा नाहीं त्याला मुजरा करावयास सांगणें म्हणजे मनाला उलटा बोध करून पेंचांत पाडण्यासारखें आहे. ६ स्मृति—आठवण; उद्दाम-रटेल, उपहास-थट्टा, स्वत्व-स्वाभिमान, हिंदद्वेषी तख्त—हिंदूंचा द्वेष करणारें आदिलशहाचें सिंहासन ७ क्रुद्ध जाहला—संतापून गेला, उमराव—वडे लोक; जातिवंत-बाणेदार वृत्तीचे, जनक—बाप (शहाजी राजे) हतबुद्ध—चकित, स्तब्ध-गप्प, शांत; शिवाजीनें आपली प्रतिज्ञा खरी केली.

**४७ सदरेंतील पैजेचे विडेः**—दरबारांत एखादें जोखमीचें काम अंगा-वर घ्यावयाचें झाल्यास शपथ घेऊन पैजेचा विडा उचलण्याची पूर्वी पद्धत असे. सदरेंत—दरबारांत १ सोसाट्याच्या वादळांत—बाहेर इतके पहारेकरी शिवाजीवर टपून होते तरी तो पेटाऱ्यांत बसून निसटून गेला. दिल्लीश—औरंग-जेब बादशहा, काफिर—धूर्त शत्रू, तरबेज—चलाख ४ सशाचे कान घेऊन—टवकारून पाहून, यमसदनीं-मृत्यूच्या दरबारांत, ५ नेत्रद्वय-डोळे; अंत-मरण

शिवाजीच्या वेळीं त्याच्या जिवाला जीव देणारीं; फितुरी व देशद्रोही मंडळींचा वेळप्रसंगीं बळी घेणारीं, विश्वासू व बाणेदार माणसें होतीं. म्हणून तर त्याला मराठेशाही स्थापतां आली.

**४८ आमुची मायबोली**:—१ मातब्बरी–थोरवी, पञ्चखण्डान्तरीं–पांची खंडांत, तिच्या कुशीचा–तिचा मुलगा; त्यजी–टाकून देतो. २ उदेलें–उदयाल –उत्कर्षाला आलेलें, प्रतिष्ठापुनी–स्थापन करून, अभ्यन्तरीं–हृदयांत ३ भिन्न धर्मानुयायी–निरनिराळ्या धर्माच्या पाठीमागें जाणारे; सहिष्णुत्व–सहनशीलता, एकीची भावना; जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापें–पराक्रम करून–उत्तम वाङ्मय निर्माण करून हिचें नांव जगांत वाढवूं. ४ कालोदरीं—काळाच्या पोटांत; हिची थोर संपत्ति – आपल्या भाषेंतील कितीतरी जुनें ग्रंथ, पोथ्या, बखरीं, ऐतिहासिक कागदपत्रें, सांदीकोपऱ्यांत–अज्ञातवासांत पडून आहेत; त्यांचें नीट संशोधन करणें आपलें कर्तव्य आहे, उपेक्षेमुळें–हेळसांड झाल्यामुळें, खण्डणी देणें–आपला हिस्सा देणें.

**४९ श्री महाराष्ट्रगीत**:—आपल्या महाराष्ट्राचा इतिहास फार उज्वल आहे. सह्याद्रीचा प्रत्येक कण याची साक्ष देत आहे. आपल्या देशावर प्रेम करणें व आपल्या देशाच्या इतिहासाचा व भूगोलाचा अभ्यास करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्यायोगानें स्वाभिमान व स्वदेशप्रेम उत्पन्न होतें. १ प्राजक्तीच्या दळदारी देशा–सुंदर पाकळ्या असलेल्या पारिजातकाच्या फुलांच्या देशा; मर्द–शूर पुरुष; इहपरलोक—पृथ्वी व स्वर्ग, परमार्थ – मोक्ष; वैराग्य–संसाराविषयीं तिटकारा २ झुंजार – शूर, दर्यावर्दी मर्दुमकी – समुद्रावरील शौर्य, साहस; ग्वाही – साक्ष. ३ दिगंबर – कंगाल, इस्तंबूल – हल्लींचे कॉन्स्टॅन्टिनोपल शहर – तुर्कस्थान. ४ हिरकणी – रायगडावर हिरकणी नांवाची गवळण रोज दुध घालायला येत असे. एके दिवशीं तिला रात्र झाली, गडाचे दरवाजे बंद झाले व ती आंत अडकली गेली. घरीं तिचें तान्हें मूल एकटेंच उपाशीं होतें. तिनें जिवाचा हिय्या करून बुरुजावरून उडी मारली व मुलाला पाजण्यासाठीं घरीं निघून आली. वात्सल्यप्रेमाच्या प्रभावामुळें तिला कांहींही इजा झाली नाहीं. या प्रसंगावरून त्या बुरुजाला 'हिरकणी' बुरुज हें नांव पडलें; जिजाईचा तान्हा–शिवाजी.

[library stamp]



५० मावळगीतः—कणा हा सह्यबन्धारा—सह्याद्रीचा बांध हा कणा आहे कारण त्यायोगानें कोंकण व देश असें महाराष्ट्राचे दोन भाग पडले गे; पोलादी–चिवट; सर्फराजीचे—भरभराटीचे; म्होरप्या–पुढारी, सर्जा—सिंह,–शिवाजी; चुव्वा—उंदीर, ' शिवाजी हा डोंगरातला उंदीर आहे. त्याला सहज पकडून आणतो, ' अशी अफजुलखानाची प्रतिज्ञा होती, पण तो उंदीर नसून सिंह आहे असें त्याला पुढें अनुभवानें कळलें; स्वत्व—अंगचें शौर्य, बाणेदारपणा; आत्मदानाची—स्वताचें प्राण खर्ची घालण्याची; तमाचा पिण्ड—तामसी स्वभावाचा अफजुलखान; दाणीला—वळी; वीजेचा चंद्र लीला करुन दाखवी–शिवाजी लहान असून त्यानें थोर पराक्रम केला–धिप्पाड व शूर अफजलखानाला ठार केलें. भाण्डी–तोफा; झाडी भाण्डली–झाडींत दडालेले मावळें सैन्य लढलें. अनाथ म्लेंच्छ सेना—सेनापती मारला गेल्यामुळें पोरकें झालेलें मुसलमानी सैन्य; हुडा—बुरुज; ग्वाही—साक्ष, द्वाही–शपथपूर्वक अडथळा.

५१ शिवराजस्तोत्रः–१दुही–दुफळी, मन्सबी–अधिकाराची जागा, तदा–तेव्हां; २ जिला पाहतां शिवाजीनें कल्याण शहर लुटल्यावर आबाजी सोनदेवानें कल्याणच्या सुभेदाराची सून पकडून तिला शिवाजीपुढें उभें केलें. त्यानें तिला आईप्रमाणें समजून साडीचोळी अर्पण करून सुभेदाराकडे पोचतें केलें. शिवाजीला थोर विभूति कां म्हणतात याचें हें उत्तम उदाहरण आहे. शुद्धभावें—निर्मळ भावनेनें. ३ यावनी—मुसलमानी, बजाजी निंबाळकर बाटून मुसलमान झाला होता त्याला हिंदु करून शिवाजीनें स्वताची मुलगी दिली; आत्मजेला—मुलीला. यावरून शिवाजी ' आधीं केलें व मग सांगितलें ' अशा कोटींतील कर्मवीर होता, हें सिद्ध होतें. ४ विप्र—ब्राह्मण, अविंध—मुसलमान; समत्वें—सारख्या भावानें. ५ तपोभूमिका—तपश्चर्या करण्याची भूमि; उपाधी शतांची—मागें शेंकडो व्याप असून त्यांची ज्याला आठवण होत नसे. राजयोगीश्वर—राजा असून योग्याप्रमाणें ज्याची वृत्ति आहे असा शिवाजी. ६ लोकाग्रणी—लोकांचा पुढारी ७ गुरूच्या पदीं—समर्थ रामदासाच्या पायावर; दौलत—सगळें राज्य, राजसंन्यासी—राजा असून संन्यासी.

५२ प्रियकर हिंदिस्तानः—प्रियकर—आवडता, उपमान–ज्याची उपमा द्यावयाची तें, दाखला; निधान—खजिना, साठा; तुला—तुलना.

---

REFBK-0004238

REFBK-0004238